





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २१.०६.२०२५ | अंक नं. ७१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







## पंढरीच्या वारीला जाणाऱ्या दिंड्यांच्या मार्गावर दुर्गंधी अन् घाणीचे साम्राज्य

### अहिल्यानगर महानगरपालिकेचा निष्काळजीपणा वारकऱ्यांसाठी ठरू शकतो घातक

नगर – आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरीच्या वारीला जाणाऱ्या अनेक दिंड्या नगर शहरातून जात असतात, मात्र या दिंड्यांच्या मार्गावर शहरात दुर्गंधी अन् घाणीचे साम्राज्य पसरलेले असून, अनेक ठिकाणी पथदिवेही नाहीत, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून, महापालिकेचा हा निष्काळजीपणा वारकऱ्यांसाठी घातक ठरू शकतो, असा आरोप भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

२१ जून रोजी सकाळी शहरातील ज्या भागातून दिंड्या जातात, त्या भागाची पदाधिकाऱ्यांनी पाहणी केली असता अतिशय विदारक परिस्थिती समोर आली. कोठला स्टॅण्ड परिसरात अवैधरीत्या कत्तल केलेले जनावरांचे मांस या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर टाकलेले आढळून आले. तसेच कचरा वारंवार पेटवून दिला जाते. या ठिकाणी प्रचंड दुर्गंधी असून घाणीचे साम्राज्य दिसून आले. आषाढी एकादशी वारीला जाणारे भाविक व शहरातील सामान्य नागरीक यांना तेथे मोठ्या प्रमाणात दुर्गंधीला सामोरे जावे लागत आहे.





दिंड्यांच्या मार्गावर कोठला परिसरात टाकण्यात आलेला कत्तलखान्यातील कचरा तसेच पेटवून दिलेला कचरा याची पाहणी करताना भाजपाचे पदाधिकारी.

वारकरी संप्रदायाची व सामान्य नागरिकांची महापालिका प्रशासनाने अत्यंत वाईट अवस्था केली आहे. या संदर्भात महापालिका आयुक्त यशवंत डांगे व आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर यांना फोन केला असता दोघांनीही फोन उचलला नाही. त्यामुळे पदाधिकारी या संदर्भात आयुक्तांना जाब विचारण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी जात असताना त्यांचा फोन आला. त्यांना सर्व परीस्थितीची कल्पना दिली व याबाबत महापालिका वारीच्या संदर्भात वारकऱ्यांना सुविधा देण्यासाठी गंभीर नाही, याची जाणीव आयुक्तांना करून दिली. महापालिकेचा निष्काळजीपणा वारकऱ्यांसाठी घातक ठरु शकतो, असे त्यांना सुनावले. तसेच या भागात तातडीने स्वच्छता करण्यात यावी तसेच कोठला परीसरात सीसीटिव्ही कॅमेरा व हायमास्ट दिवे कायमस्वरुपी बसवावेत, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी ॲड. अभय आगरकर, मध्य मंडल अध्यक्ष मयूर बोचूघोळ, संजय ढोणे, सचिन पारखी, प्रशांत मुथा, वैभव लांडगे, गोपाल वर्मा, हर्षल जोशी, दिपक देहेरेकर, पियुष तावरे, सचिन पळशीकर, भूषण झारखंडे, डॉ. दर्शन करमाळकर आदि पदाधिकारी उपस्थित होते.


## बाजारपेठेत चोरटे झाले पुन्हा सक्रिय; महिलेच्या पर्समधून दागिन्यांची चोरी

नगर – शहरातील घास गल्ली येथील एका बँगल्स् दुकानात खरेदीसाठी गेलेल्या महिलेच्या बॅगेतील सुमारे २६ हजार ७२० रुपयांचे सोन्याचे दागिने चोरट्याने चोरुन नेले. ही घटना १९ जून रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत शबनम इम्रान सय्यद (वय ३३, रा. नागरदेवळे, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी या १९ जून रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास त्यांचा भाऊ साबीर जमीर सय्यद (वय २८) याच्यासह कापड बाजारातील घास गल्ली येथील एका बँगल्स् दुकानात बांगड्या खरेदीसाठी गेल्या होत्या.

खरेदीच्या दरम्यान शबनम सय्यद यांनी बॅगमधून पैसे काढण्यासाठी पर्स उघडली असता, पर्समधील डबीत ठेवलेले २ ग्रॅम ९४० मिली वजनाचे १४ हजार २२० रुपये किंमतीचे सोन्याचे पेंडल आणि २ ग्रॅम ५७० मिली वजनाचे १२ हजार ५०० रुपये किंमतीचे अष्टपैलु ४२ मणी हरवलेले दिसले. त्यांनी पुन्हा एकदा बॅग व्यवस्थित पाहिली, मात्र दागिने कुठेच आढळले नाहीत. यावरुन चोरट्याने हे सोन्याचे दागिने चोरुन नेल्याची खात्री झाली.

या प्रकरणी त्यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन कोतवाली कोतवाली पोलिसांनी चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला.















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# वाहतूक कोंडीमुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका

## वाहनात कोंबून होणारी वाहतुक थांबवा, सुरक्षिततेसंबंधी उपाययोजना करा : शहर वाहतूक शाखेला निवेदन

नगर - अहिल्यानगर शहरात शाळा सुटताना आणि भरताना होणारी वाहतूक कोंडी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते संबंधी उपाययोजना करण्याची मागणी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्यावतीने करण्यात आली आहे. आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली युवकचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद सागरे यांना निवेदन दिले.

वाहतुकीचे विस्कटलेले नियोजन, विद्यार्थ्यांच्या प्रमाणापेक्षा कोंबून विविध वाहनातून होणारी वाहतुक आणि शाळा सुटताना चौका-चौकात होणारी वाहतुक कोंडी संदर्भात केतन क्षीरसागर यांनी प्रश्न उपस्थित केला. यावेळी दिपक वाघ, ऋषीकेश जगताप, किरण घुले, राजू मकासरे, कृष्णा शेळके, मंगेश शिंदे, अरबाज शेख, ओमकार मिसाळ, रोहित सरना, शिवम कराळे, गौरव हरबा, स्वप्निल कांबळे उपस्थित होते.



शाळा सुटताना आणि भरताना होणारी वाहतूक कोंडी व विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते संबंधी उपाययोजना करण्याच्या मागणीचे निवेदन शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद सागरे यांना देताना राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष इंजि. केतन क्षीरसागर आदी.

नवीन शैक्षणिक वर्षासाठी शाळा सुरू होऊन काही दिवस उलटले आहेत. शाळा भरताना आणि शाळा सुटताना मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. शाळेच्या रिक्षा, बस व अन्य ट्रान्सपोर्ट वाहतुकीचे कोणतेच नियम पाळत नाही. शहरातील काही ठिकाणी रस्त्याचे काम चालू असताना ठरावीक मार्गावर मोठी वाहतुक कोंडी होत आहे. नियमांची पायमल्ली होत असताना अनेक लहान-मोठे अपघाताची मालिका सुरु होण्यापूर्वी त्याचे योग्य नियोजन करण्याची गरज आहे.

शाळेला येताना व घरी जाताना नागरिकांच्या जीवितास हानी पोहोचतील असे प्रसंग उद्भवत आहेत. आपत्कालीन परिस्थितीमध्ये रुग्णवाहिकांना देखील मार्ग मिळू शकत नसल्याची परिस्थिती निर्माण होत आहे. यामुळे एखादा अपघात झाल्यास एखाद्याला जीवाला मुकावे लागेल अशी परिस्थिती उद्भवत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

शहरात विद्यार्थ्यांची वाहतुक करणारे स्कूलबस, रिक्षा यांच्यासाठी असलेल्या आवश्यक कागदपत्र तपासण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतणारा प्रसंग उद्भवल्यास त्याची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. तर विद्यार्थ्यांना घेऊन वाहतुक करणाऱ्यांना नियम पाळण्यासाठी सक्तीची कारवाई करण्याची आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षितते संबंधी वाहतुकीचे नियोजन करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## प्रेरणादायी अक्षरधन...

वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन : "मुसाफिर"-९८२२०२०६९१



### जीवन गाणे गात रहावे... संगीत ऐकावे

दरवर्षी २१ जून हा दिवस जागतिक संगीत दिन म्हणून साजरा केला जातो. संगीत, म्युझिक याबद्दल काय अन् किती बोलावे.

संगीत हे आबालवृद्धांसाठी औषधासम काम करू शकते. ज्या जीवनात गीत, संगीत आहे त्यांच्या जीवनाचे तराणे आनंदाचे नजराणे बनतात.

अनेक संशोधनातून असे दिसून आले आहे की, संगीताचे शारीरिक आरोग्यापासून ते न्यूरॉलॉजिकल व मानसिक आरोग्यापर्यंत फायदे आहेत. जर्नल ऑफ न्यूरोसायन्समध्ये प्रकाशित संशोधनानुसार बालपणात संगीताचे धडे घेतलेले आजचे वृद्ध लोक संगीताची काहीही जाण नसलेल्या लोकांपेक्षा इतरांच्या बोलण्या किंवा आवाजाला जलद प्रतिसाद देतात. आवडते संगीत ऐकणे, एखादं वाद्य वाजवणं यामुळे आनंद तर मिळतोच शिवाय स्मरणशक्ती तीक्ष्ण राहते. इतर नकारात्मक भावभावनांना, चिंतांना दूर ठेवता येते.

शारीरिकदृष्ट्या पाहता संगीतामुळे झोपेची गुणवत्ता सुधारते. मन शांत, प्रसन्न राहाते. रक्तदाब व हृदयाचे ठोके सुधारतात. खरं तर माझा अनुभव साधा, सरळ आहे की केवळ नाट्, सिनेसंगीतातही ठासून गुणवत्ता भरलेली आहे. त्यांची अनुभूती घेणे हा जीवनातला एक सर्वात आनंददायी क्षणांपैकी एक असतो.

वृद्ध मंडळी शारीरिकदृष्ट्या काहीसे शीण होतात अशावेळी चार प्रकारच्या संगीत थेरपीने त्यांना आनंद व आरोग्य मिळू शकते. मिशीगन विद्यापीठाच्या सर्वेक्षणानुसार ९८% वृद्धांचे म्हणणे आहे की, संगीत आरोग्यासाठी फायदेशीर आहे. ७५% लोक मानतात की संगीतामुळे ताण कमी होतो. ६५% वृद्धांना चांगला मूड लागतो. ६०% लोकांना प्रेरणा, उत्साह जाणवते.

खरंतर हे जीवनच एक गाणे, संगीत मानून, झालं गेलं, कडू गोड विसरून जगलात तर जीवनच एक गाणे बनेल - नितांत सुंदर गुणगुणावंसं व पुन्हा पुन्हा म्हणावंसं असं... **किशोर गांधी**



नगर-पुणे राज्य महामार्गावरील केडगाव येथील अंबिकानगर बस स्टॉपजवळील परिसरात स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी सुमित लोंढे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# अंबिकानगर बस स्टॉपजवळ स्पीड ब्रेकर बसविण्यात यावेत

## सुमित लोंढे यांचे सार्वजनिक बांधकाम विभागाला निवेदन, अपघातांचे प्रमाण वाढले

नगर - नगर-पुणे राज्य महामार्गावरील केडगाव येथील अंबिकानगर बस स्टॉपजवळील परिसरात स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी केडगाव येथील सुमित लोंढे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या भागात शाळा, बँक, रुग्णालय, तसेच भाजी मार्केट असल्यामुळे दिवसभर नागरिकांची वर्दळ मोठ्या प्रमाणावर असते. यामुळे शाळकरी मुले, महिला, वृद्ध नागरिक यांचे सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. पूर्वी या ठिकाणी स्पीड ब्रेकर होते, परंतु रस्त्याचे नूतनीकरण झाल्यानंतर ते काढण्यात आले आहेत. त्यानंतर या ठिकाणी अपघातांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. भरधाव वेगाने जाणाऱ्या वाहनांमुळे रस्त्याने पायी चालणाऱ्या नागरिकांना जीव मुठीत धरावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर अंबिकानगर परिसरात तातडीने स्पीड ब्रेकर बसवावेत, अशी मागणी केडगाव येथील सुमित लोंढे यांनी केली आहे.

या निवेदनप्रसंगी अजित कोतकर, सोमनाथ गुंड, महेश पठारे, तुकाराम कोतकर, गणेश लोंढे, अजित ठुबे, शुभम लोंढे, निलेश लाळगे, माधव झेंडे, गणेश शिंदे, राहुल शिंदे, अमोल कोतकर, दत्तात्रय कोतकर, देवा कोबरने, शुभम शिंदे आदी उपस्थित होते.

# केडगावात विजेचा लपंडाव; नागरिक त्रस्त, पुरवठा सुरळीत करा अन्यथा 'आंदोलन'

नगर - केडगाव उपनगराचा गेल्या एक महिन्यापासून विजेचा लपंडाव चालू आहे. त्यामुळे परिसरातील नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहे. विद्युत विभागाकडून कुठलीही पूर्वसूचना न देता रात्री-अपरात्री लाईट जात असल्यामुळे नागरिकांना संपूर्ण रात्र अंधारात काढावी लागत आहे. पावसाळ्याचे दिवस सुरू असून विद्युत विभागाने अडथळा ठरणाऱ्या झाडाच्या फांद्या पावसाळ्यापूर्वी तोडणे गरजेच्या होत्या, मात्र कुठल्याही उपयोजना झालेल्या दिसत नाही. लाईट संदर्भात कुठलीही पूर्वसूचना न देता वारंवार वीज पुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये विद्युत विभागाच्या विरोधात संतापाची लाट असून, येत्या ८ दिवसात केडगाव उपनगराचा विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावा अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा सहाय्यक अभियंता राहुल शिलावत यांना निवेदनाद्वारे माजी सभापती मनोज कोतकर यांनी दिला.



केडगावचा विजेचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लावण्याच्या मागणीचे निवेदन सहाय्यक अभियंता राहुल शिलावत यांना देताना मनोज कोतकर. (छाया - लहू दळवी)

यावेळी मनोज कोतकर निवेदनात पुढे म्हणाले की, केडगाव उपनगरामध्ये नागरिक मोठ्या संख्येने वास्तव्यास आली आहे. मात्र विद्युत विभागाच्या ट्रांसफार्मरची संख्या कमी आहे. दोन पोल मधील अंतर जास्त असल्यामुळे तारा अक्षरशः लोंबकळत आहे. त्यामुळे देखील वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. तसेच या परिसरामध्ये शेतकरी वर्ग राहत असल्यामुळे त्यांची विजेवरची उपकरणे चालत नसल्यामुळे त्यांचे देखील हाल होत आहे. तसेच व्यवसाय करणाऱ्या नागरिकांची लाईटअभावी मोठे आर्थिक नुकसान होत आहे. विद्युत विभागाचा दूरध्वनी क्रमांक कायमस्वरूपी बंद असतो, त्यामुळे नागरिकांनी तक्रार कुठे करायची तसेच कर्मचारी अपुरे असल्यामुळे झालेला प्रॉब्लेम तातडीने सोडवता येत नाही. त्यामुळे केडगावकरांना अक्षरशः एक-एक दोन-दोन दिवस अंधारात काढावी लागतात. विद्युत विभागाकडे केडगावच्या वीज प्रश्न संदर्भात वारंवार लेखी निवेदने दिले आहे. तीव्र स्वरूपाचे आंदोलने देखील केले आहे. मात्र प्रश्न सुटला जात नाही. दौंड रस्ता, सोनेवाडी रस्ता, पुणे महामार्ग, लिंक रोड, लोंढे मळा, केडगाव देवी रस्ता विजे अभावी अक्षरशः अंधारात असतात. तरी विद्युत विभागाने येथे ८ दिवसात केडगाव उपनगराचा विजेचा प्रश्न न सोडविल्यास कुठलीही पूर्वसूचना न देता तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा महानगरपालिकेचे मनोज कोतकर यांनी दिला आहे.

# भूमि अभिलेख कार्यालयात खाजगी एजंट कायमस्वरूपी प्रतिबंध करावा अन्यथा 'आमरण उपोषण'

नगर - अहिल्यानगर जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय व जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील तालुका भूमी अभिलेख कक्षा मधील सरकारी दप्तरांमध्ये हेराफेरी करून कागदपत्र काढून देण्याच्या नावाखाली गोरगरीब नागरिकांकडून आर्थिक लूट करणाऱ्या खाजगी एजंटची व त्यांना पाठबळ देणाऱ्या संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची जंगम मालमत्तेची सखोल चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करण्याच्या मागणीसाठी मानव विकास परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष अफसर शेख यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्री, आयुक्त नाशिक, पालकमंत्री, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व भूमी अभिलेख अधीक्षक यांना निवेदन दिले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, भूमी अभिलेख कार्यालयामध्ये खाजगी इसम एजंट अनेक वर्षापासून नागरिकांना शासकीय दस्तऐवज काढून देण्याच्या नावाखाली आडमाप पैशाची मागणी करून आर्थिक लूट राजरोसपणे करत आहे. भूमी लेख कक्षामध्ये शासकीय अधिकारी असताना देखील अशा लूट करणाऱ्या या एजंट राजरोसपणे त्या कार्यालयात दररोज उपस्थित राहतात संबंधित अभिलेख कक्षा मधील अधिकारी हे नुसते पाहण्याचे काम का करत आहे याचा अर्थ असा की, त्याच कार्यालयातील काही अधिकारी आर्थिक हित जोपासण्याचे काम संबंधित खाजगी एजंटच्या माध्यमातून उघडपणे करतात हे असे वरिष्ठ अधिकारी



अफसर शेख

यांच्या लक्षात का येत नाही. व खाजगी एजंट हे राजरोसपणे दस्तऐवजाची हेराफेरी चे काम करतात मूळ दस्तऐवजामध्ये आर्थिक बाबी करिता खाडाखोड अथवा काही दस्ताऐवज हे गहाळ करणे किंवा ते फाडून टाकण्याचे प्रकार उघडण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी त्या ठिकाणी असणारा अधिकारी यांचा तर या एजंट इसम यांना त्या कार्यालयातील काही अधिकाऱ्यांना आशीर्वाद आहे का? या अशा घटनांमुळे नागरिकांची होत असलेली आर्थिक लूट त्वरित थांबवण्याकरिता संबंधित एजंट वरती तसेच त्यांना पाठबळ देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून त्यांची जंगम मालमत्तेची व अनेक वर्षापासून असणारा खाजगी एजंट यांची सखोल चौकशी करून त्याची देखिल जंगम मालमत्तेची चौकशी करून कारवाई करण्यात यावी व भूमी अभिलेख कार्यालयामध्ये खाजगी एजंट येण्यास कायमस्वरूपी प्रतिबंध करण्यात यावे व शासकीय नियमाप्रमाणे दस्ताऐवज काढण्याकरिता असणारी शासकीय फी किती आहे याबाबतचे सूचनाफलक लावण्यात यावे जेणेकरून नागरिकांची आर्थिक लूट व फसवणूक होणार नाही व ज्या कार्यालयात खाजगी एजंट दिसून येईल त्या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अन्यथा मानव विकास परिषदेच्या वतीने भूमी अभिलेख कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

## मिलींद मते यांचे हृदयविकाराने निधन

नगर - नगर तालुका वाळुंज येथील रहिवासी मिलींद अशोक मते (वय २५) यांचे २० जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर वाळुंज अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे आई, ३ बहिणी, मेहुणे, भाचे असा परिवार आहे.

## पोपटलाल पिपाडा यांचे अल्प आजाराने निधन

नगर - कोठी रोडवरील आदिनाथ कॉलनीतील संकल्प हॉस्पिटल जवळील 'पियुष बंगला' येथील रहिवासी पोपटलाल बन्सीलाल पिपाडा (वय ८५) यांचे २१ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



त्यांच्यामागे प्रदीप व संजय ही मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ते मार्केटयार्ड येथील पिपाडा सरकी फर्मचे ते संचालक होत. पियुष, रोहित, अनूप पिपाडा यांचे ते आजोबा होत.

## होनाजी औसरकर यांचे दीर्घ आजाराने निधन



नगर - औसरकर मळा येथील रहिवासी होनाजी काशिनाथ औसरकर (वय ७०) यांचे २१ जून रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्यामागे २ मुले, २ मुली, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. अमीत व संदीप औसरकर यांचे ते वडील होत.

## श्रीमती अनुसयाबाई देवकर यांचे अल्प आजाराने निधन

चिचोंडी पाटील - चिचोंडी पाटील येथील रहिवासी श्रीमती अनुसयाबाई गोपाळा देवकर (वय ९०) यांचे २० जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर मोतीबाग अमरधाम चिचोंडी पाटील येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे ३ मुले, सुना, मुली असा परिवार आहे. त्या गंगाधर, सुरेश, दत्तात्रय, कै. रामकिसन देवकर यांच्या मातोश्री होत.

# अपंग, घटस्फोटीत, पारित्यक्ता या सवलतीखाली बदलीकरिता खोटे पुरावे देवून फसवणूक केल्याबद्दल गुन्हे दाखल करावे अन्यथा 'आमरण उपोषण' करणार

नगर - अहिल्यानगर जिल्ह्यात अनेक खोटे अपंग शिक्षकांनी खोटे दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून बदलीच्या लाभापोटी त्यांचा वापर केलेला आहे व आता होणाऱ्या बदल्या करिता खोट्या प्रमाणपत्राचा सर्रास वापर करताना दिसून येत आहे. त्यामुळे अपंग प्रमाणपत्र धारकांची शारीरिक तपासणी करूनच त्यांना बदली प्रक्रियेत समाविष्ट करून घ्यावे तसेच महिला शिक्षकांनी संवर्ग एक मध्ये घटस्फोटीत व परितक्त्या या सवलतीचा लाभ मिळावा म्हणून त्यांनी फक्त नोटरीच्या आधारे बदलीमध्ये लाभ घेण्याकरिता खोट्या नोटरी करून प्रतिज्ञापत्र दिलेले असल्याने त्यांची संपूर्ण सत्यता तपासून बदली प्रक्रिया थांबवण्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने शिक्षणाधिकारी यांना तालुका अध्यक्ष चंद्रशेखर पंचमुख यांनी निवेदन दिले.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, शिक्षकांनी यापूर्वीही फक्त नोटरीच्या आधारे बदलीचा लाभ घेतला असून आताही अशाच प्रकारचा लाभ घेण्याचा प्रयत्न महिला शिक्षिका करत आहे. घराजवळ शाळा मिळावी म्हणून बदली करिता सोपा पर्याय म्हणून हा मार्ग सर्वच निवडला जातो तसेच आता होणाऱ्या बदल्या करिता मोठ्या प्रमाणात असे अनेक महिला शिक्षकांनी नोटरी करून दिल्या आहे या सर्वांची चौकशी होणे गरजेचे असून या सर्वांनी फक्त बदली लाभाकरिता घटस्फोटीत व परितक्त्या असल्याचे वकील मार्फत पैसे देऊन खोटी माहिती पुरवून नोटरी केली आहे. घटस्फोटीत व परितकत्या म्हणून बदलीसाठी लाभ घेणाऱ्या अनेक महिला शिक्षिका बदलीसाठी या बाबीचा वापर करतात सर्व घटस्फोटीत व परितकत्याची कसुन चौकशी व्हावी त्यांची



चंद्रशेखर पंचमुख

शहानिशा व्हावी काही घटस्फोटीत शिक्षकांनी तर नव्याने लग्न करून आपला संसार थाटला आहे. परंतु ही बाब त्यांनी लपून ठेवली आहे. आपले जुनेच घटस्फोटीत प्रमाणपत्र दाखवून या शिक्षिका संवर्ग एक चा फायदा घेत आहे या शिक्षिका धाकट शाहीने हक्क दाखवून लाभ घेण्याचा प्रयत्न करीत आहे त्यांनी बदली पोर्टलवर संवर्ग एक मधून फॉर्म भरलेले आहे या शिक्षकांची आजची वैवाहिक स्थितीबाबत सखोल चौकशी करून हमीपत्र भरून घ्यावे तसेच काही महिला शिक्षकांनी नोटरीवर परितक्त्या असलेले दाखले दिले आहे. परंतु या शिक्षिका आपल्या पती व लेकरांसोबत राहतात त्यांची दिलासा सेलमध्ये साधी नोंद ही नाही. सोईने बदली व्हावी म्हणून त्यांनी नोटरीवर परितक्त्या असलेले दाखवले आहे. त्यांची चौकशी केल्यास तात्काळ सत्यता समोर येईल या खोट्या घटस्फोटीत व परितक्यांची कोणतीही चौकशी न करता कागद पडताळणी समितीने त्यांचे फॉर्म मान्य करून त्यांना बदली प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले आहे. यावरून असेच दिसून येते की या सर्व महिला शिक्षकांना अधिकारी वर्गाचा आशीर्वाद आहे या महिला शिक्षिका शासनाची फसवणूक करतात याकरिता संवर्ग एक मध्ये अर्ज करणाऱ्या सर्वांची निपक्षपातीपणे चौकशी करून कागदपत्र फेर तपासणी करून दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करावे व बदलीसाठी अर्ज करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांची सत्यता पडताळूनच त्यांना बदली प्रक्रियेमध्ये सहभागी करावे व ताबडतोब अशा खोट्या बदल्या थांबवाव्यात अन्यथा पक्षाच्या वतीने जिल्हा परिषदेच्या आवारात २४ जून पासून आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची तातडीने मदत द्या

नगर - मे २०२५ मध्ये अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची मदत तातडीने देण्यात यावी अशी मागणी माजी पंचायत समिती सदस्य तथा भारतीय जनसंसदचे जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी शासनाकडे केली आहे.

गतवर्षी कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांद्याचे पहिल्या टप्प्यात टाकलेले रोप वाया गेले. त्यामुळे पुन्हा रोपे टाकण्यास आणि कांदा लागवडीस उशीर झाला. पर्यायाने कांदा काढण्यासाठी ही उशिरा झाला. बहुतेक कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा कांदा शेतातच असताना गेल्या कित्येक वर्षात कधीच एवढ्या लवकर न आलेला पाऊस मे महिन्याच्या १३ तारखेलाच सुरू झाला. यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. त्यासोबतच फळबाग आणि इतर उन्हाळी शेती पीकांचेही खूप नुकसान झाले. नगर तालुक्यातील वाळकी, खडकी, अकोळनेर, सारोळा कासार, गुंडेगाव, राळेगण या ठिकाणी अनेक घरांची पडझड झाली. सुमारे ३०२ जनावरे दगावली. ४००० हेक्टर क्षेत्रावरील पिकाचे नुकसान झाले, अनेक विहिरी, बोअरवेल, शेततळे बुजले, कित्येक हेक्टर शेतजमीन वाहून गेली.

अशाच प्रकारे नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील गावामध्ये सुद्धा २५ मे रोजी ६८ मिलिमीटर तर २६ मे रोजी ६५ मिलिमीटर पाऊस झाला. या पावसामुळे शेती पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांचा उरुळी लावून ठेवलेला कांदा शेतातच खराब झाला. शासनाने सुद्धा अहिल्यानगर जिल्हयामधे झालेल्या नुकसानीची दखल घेत तातडीने पंचनामे केले. मात्र शेतीपिकांची नुकसानीची भरपाई मिळणे अद्याप बाकी आहे. सध्या खरीप हंगाम सुरू झालेला असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पूर्व मशागत, बियाणे, खते, पेरणी आदी बाबींसाठी मोठ्या प्रमाणावर पैशांची आवश्यकता आहे. अशा वेळेस शासनाने शेतकऱ्यांना पीकनुकसानीची मदत दिली तर शेतकरी वर्गाला तो मोठा आधार ठरेल.

यास्तव मे मध्ये झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर तातडीने अदा करण्यात यावी अशी मागणी भारतीय जनसंसदचे राज्य अध्यक्ष अशोक सब्बन, नगर तालुका अध्यक्ष पोपटराव साठे, नगर शहर अध्यक्ष रईस शेख, कुमार डावखर, अशोक ढगे, कैलास पठारे, अशोक डाके, वीर बहादुर प्रजापती, विजय शिरसाठ, बाळासाहेब पालवे, बबलू खोसला, शब्बीर भाई पठाण, ॲडव्होकेट डाळिंबकर, साळवे गुरुजी, शेख फकिर मोहम्मद, सुनील टाक व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे.

# कर्जदारास २ महिना कैद व १,३२,००० रुपये दंडाची शिक्षा

नगर - अहमदनगर येथील अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने कर्जदार वैशाली उमेश सावंत, रा. अहिल्यानगर हिस निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अन्वये दोषी ठरवून २ महिना कैद व १,३२,००० रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. दंडाची रक्कम न भरल्यास १५ दिवस कैद भोगण्याची शिक्षा देखील दिलेली आहे. तसेच नुकसान भरपाई रक्कम फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांना देण्याचा आदेश दिलेला आहे. वैशाली उमेश सावंत यांनी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी, यांचेकडुन घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीपोटी दिलेला धनादेश वटला नाही व नोटीस मिळुनही धनादेशाची रक्कम दिली नाही त्यामुळे संस्थेने वैशाली उमेश सावंत यांचे विरूद्ध न्यायालयात फिर्याद दाखल केलेली होती. संस्थेतर्फे देण्यात आलेला पुरावा ग्राह्य धरूण न्यायालयाने कर्जदार वैशाली उमेश सावंत यांना वरील प्रमाणे शिक्षा सुनावली आहे. संस्थेच्या वतीने सागर लक्ष्मण फुलारी यांची साक्षी महत्वाची ठरली. फिर्यादी मंगलदिप मल्टीस्टेट अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी यांचे करीता ॲड. सुहास. एस. टोणे यांनी न्यायालयात बाजु मांडली. त्यांना ॲड. अमित अडागळे, ॲड. विजय केदार, ॲड. विलास ढोणे, ॲड. गौरव हरबा, ॲड. ओम गुंड यांनी सहकार्य केले.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### तोंडात अल्सर झाल्यास...

तोंडाच्या अल्सरसाठी काही घरगुती उपाय आहेत ज्याचा वापर करून तुम्ही वेदना कमी करू शकता आणि लवकर बरे होऊ शकता. तोंडात आलेले फोड किंवा अल्सर हे अतिशय वेदनादायक असतात आणि ते एका आठवड्यापर्यंत राहू शकतात. या लहान फोडांमुळे होणारी वेदना आणि अस्वस्थता खूप तीव्र असते. या फोडांमुळे खाणे, पिणे आणि बोलणे यासारख्या दैनंदिन क्रियांमध्ये अडथळा येऊ शकतो. घरच्या घरी तोंडाच्या फोडांवर उपचार करायचा असेल तर कच्चा मध हा उत्तम पर्याय ठरतो. मधातील बॅक्टेरिआला विरोध करणारे गुणधर्म हे ओलावा प्रदान करतात तसेच ते कोरडे होण्यापासून रोखून प्रभावित क्षेत्रावर उपचारही करतात. कच्च्या मधात चिमूटभर हळद मिसळून ते लावल्यानेही तोंडातील अल्सर दूर होतात. तसेच नारळाचे तेल लावल्याने वेदनांपासून त्वरित आराम मिळतो.

## पाककला

### चवळीची गरम मसाल्याची आमटी

**साहित्य :** २ वाट्या भिजवलेली चवळी, ३ कांदे, १ वाटी ओले खोबरे, १० लसुणीच्या पाकळ्या, १ हिरवी मिरची व चार-पाच स्लाईस आलं, प्रत्येकी पाच लवंग आणि काळी मिरी, १ इंच दालचिनीचा तुकडा, १ चमचा धणे, १/२ चमचा बडीशेप, १ वेलची, थोडासा बादाम, एक पाकळी चक्रफुल आणि जायपत्रीच्या दोन काड्या, १ चमचा मिरची पावडर, १/२ चमचा हळद, २ पळी तेल, १ चमचा चिंचेचा कोळ, २ चमचे बारीक चिरलेली कोथिंबीर, १ बटाट्याच्या फोडी, १ चमचा साखर चवीसाठी

**कृती :** प्रथम चवळी आणि मोठ्या बटाट्याच्या फोडी थोडे मीठ टाकून शिजवून घ्या.त्यानंतर एक कांदा उभा चिरून घ्यावा व लसून आले आणि मिरची कापून घ्यावे आणि गरम मसाल्याचे साहित्य काढून घ्यावे. नंतर भांड्यात एक चमचा तेल घालून त्यात प्रथम लसूण, आले आणि हिरवी मिरची थोडी परतल्यानंतर खडा गरम मसाला घालावा. धणे, बडीशोप घालून नीट परतून घ्यावे आणि नंतर ओलं खोबरं घालून खोबरं तांबूस होईपर्यंत सर्व मसाला एकत्र परतून घ्यावा व चिंचेचा कोळ घालून मिक्सरमधून बारीक वाटून घ्यावे. त्यानंतर भांड्यात उरलेलं तेल घालून त्यात उरलेला कांदा बारीक चिरून फोडणीस घालाव व थोडा परतल्यानंतर त्यात हळद आणि मिरची पावडर घालून मिक्स केल्यावर शिजलेली चवळी आणि बटाटा घालावे व बारीक वाटून घेतलेले वाटण त्याचप्रमाणे गरजेनुसार मीठ व साखर घालून चांगली उकळ काढून घ्यावी. कोथिंबीरीने सजवून गरम भाताबरोबर किंवा चपाती, भाकरी बरोबर सर्व्ह करावी.

## वास्तू

स्वयंपाकघरात बनणारे रुचकर जेवण ही आपली प्राथमिक गरज आहे. दक्षिण पश्चिम दिशा आपल्या स्वयंपाकगृहासाठी अचुक आहे. आपण स्वयंपाक गृहाची दिशा बदलवू शकत नसाल तर, अग्नि देवतेला प्रसन्न करण्यासाठी आपला गॅस, शेगडी पूर्व दिशेने ठेवा. स्वयंपाकगृह आणि बाथरूम एकाच भिंतीला लागून नसावे याची दक्षता घ्या.

## सल्ला

घट्ट दह्यासाठी कोमट दुधात दही घातल्यानंतर त्यात हिरव्या मिरचीचे देठ टाकावेत.

## सौंदर्य

गुलाबजल दुधामध्ये मिक्स करुन चेहऱ्याला लावावे. चेहऱ्यावर तजेला येईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २२ जून २०२५

**भागवत एकादशी, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ कृष्णपक्ष, भरणी १७।३९, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** घाईघाईने घेतलेले निर्णय चुकीचे ठरू शकतात. काम करावेसे वाटणार नाही. ाजकीय क्षेत्रातील ताण-तणाव कमी होईल.

**वृषभ : नोकरीसाठी** प्रस्ताव येईल. रागाने कोणतीही गोष्ट करू नका. विचारपूर्वक निर्णय घ्या. घरगुती वातावरण आनंदी राहील.

**मिथुन :** नोकरदार वर्गाला कामात येणारे अडथळे दूर होतील. आर्थिकबाबतीत काटकसर करणे योग्य राहील. धार्मिक गोष्टींसाठी खर्च कराल.

**कर्क :** कोणाच्या वैयक्तिक गोष्टीत हस्तक्षेप करू नका. बाकी दिवसांचा कालावधी चांगला असेल.

**सिंह :** प्रस्ताव चांगले असतील ते स्वीकारा. व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त उलाढाल वाढेल. आर्थिकदृष्ट्या लाभ होईल. व्यवसायात अनपेक्षित लाभ होईल.

**कन्या :** ाहातील सर्व दिवस चांगले आहेत, त्यामुळे आता चिंता करण्याची गरज नाही. नोकरदार वर्गाला कामाच्या संदर्भात चांगले प्रस्ताव येतील.

**तूळ :** मैत्रीचे नाते दृढ होईल. मुलांची प्रगती होईल. भावंडांशी संवाद गोडीचा ठेवा. आरोग्याची काळजी घ्या.

**वृश्चिक :** एका दगडात दोन पक्षी मारण्याचा डाव साध्य होणार आहे. मनोबल वाढेल. प्रकृती उत्तम राहील. वैवाहिक जीवन सुखाचे राहील.

**धनु :** प्रयत्न करूनही यश मिळत नव्हते. सध्या हे यश मिळेल. परिणामी कामातील गती वाढते. सध्या फार धावपळ करावी लागणार नाही.


**मकर :** कोणावर अवलंबून राहण्याचीही गरज नाही. आपले काम वेळेत होणार हे मात्र निश्चित. आपली मानसिकताही चांगली राहते.

**कुंभ :** कामात लक्ष मिळेल. चांगल्या गोष्टींसाठी पाठपुरावा करावा लागणार नाही. त्या सहज मार्गी होणार आहेत.

**मीन :** व्यवसायात गुंतवणूक कराल आणि त्या गुंतवणुकीतून फायदा होईल. नोकरदार वर्गाला वरिष्ठांचे सहकार्य मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२०४ सौ.शैलजा कुलकर्णी



शब्दगंध क्र. ७२०३ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) लाट; लहर ३) हवेहवेसे वाटणे; आकर्षण ६) भारताचे पहिले पंतप्रधान - पंडित ++++++ नेहरू ८) शौर्याचे गीत रचून गाणारा १०) गेलेला; भूत; दशा; अवस्था ११) डावा; खराब १२) एक झाड; वटवृक्ष १३) एक पालेभाजी १५) झाडावर पिकलेले फळ १६) नक्षत्र; चांदणी १८) योग्य; पात्र २०) सैन्य वगैरेंचे शिस्तबद्ध संचलन २२) डोळ्यातील बुबुळावर येणारा कवडा २३) रक्षण करणारा; रखवालदार

**उभे शब्द :-** १) एक लोककला; निर्लज्जपणाचे वर्तन २) वाद्यांचा मोठा आवाज ३) मुस्लीम वर्षाचा पहिला महिना ४) प्रत्येक; दर; महादेव; शंकर ५) पलीकडची बाजू; पैलतीर ७) जमीन नांगरणे, पेरणी वगैरे शेतीची कामे ९) हिरा ११) दिवा लावण्यासाठी बनविलेली कापसाची सुरळी १३) अपघातात मरण पावलेली भारताची अंतराळकन्या १४) इतर, बाकीचे १५) समुद्र; मर्यादा; अंत १६) दही घुसळून त्यातून लोणी काढल्यानंतर राहणारा द्रव १७) पाप; अधर्म १९) एक धान्य; जव; सातू २१) कुबेराचे सेवक

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** हिंमत आपल्याला पुन्हा शुन्यातून विश्व निर्माण करण्याची प्रेरणा देते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### प्लॅस्टिकचे कोणकोणते प्रकार आहेत?

प्लॅस्टिक म्हटल्यावर तुमच्या डोळ्यापुढे कॅरीबॅग, रॅपर्स, खेळणी वगैरे आली असतील. पण जॅकेट्स, कॉर्न फ्लेक्स या गोष्टीही प्लॅस्टिक आहेत असं म्हटलं तर? या सगळ्या गोष्टी पॉलिमरपासून बनतात त्यामुळे शास्त्रीयदृष्ट्या त्यांना प्लॅस्टिक म्हटलं जाऊ शकतं. पण आपण रुढार्थानं ज्याला प्लॅस्टिक मानतो त्याबद्दल विचार करू या. लिओ बेकलंड या अमेरिकन माणसानं पहिलं सिंथेटिक प्लॅस्टिक शोधलं आणि पाहता पाहता या प्लॅस्टिकनं सगळ्याच गोष्टींमध्ये शिरकाव केला.

पॉलिस्टेरीन, पॉलिस्टर, पीव्हीसी, पॉलिथिन, नायलॉन या विविध प्रकारच्या प्लॅस्टिकचा शोध लागला आणि झपाट्यानं प्रगत होणाऱ्या औद्योगिक विश्वाला हात मिळाला. १९३० सालाच्या सुमारास पांढऱ्या आणि दुधी रंगाच्या चकाकत्या पांढऱ्या वस्तू बनवता येऊ लागल्या.

दुसऱ्या महायुद्धानं प्लॅस्टिकच्या वापराला चालना दिली. युद्धोपयोगी वस्तूंमध्ये प्लॅस्टिकचा वापर वाढलाच आणि त्यापाठोपाठ काही वर्षांत बाजारात टप्परवेअर, पेट बाटल्यांची चलती झाली.

प्लॅस्टिकचे पर्यावरणावर होणारे दुष्परिणाम लक्षात घेऊन जैव-विघटनशील म्हणजे बायो-डिग्रेडेबल प्लॅस्टिक पुढे येत आहे, पण त्याचा वापर म्हणावा तितक्या मोठ्या प्रमाणात होताना दिसत नाही.


### प्रेम

एकेकाळची गोष्ट आहे, महात्मा गांधी यांचे थोरले बंधू कर्जबाजारी झाले. आपल्या भावाला कर्जातून सोडविण्यासाठी गांधीजींनी आपलं सोन्याचं कडं विकलं आणि त्यातून मिळालेले पैसे आपल्या भावाला दिले. घरात आई-बाबा मारतील या भीतीपोटी त्यांनी आपल्या आई बाबांना कडं गहाळ झाल्याचं सांगितलं.

पण त्यांचे मन त्यांनाच खात होते. त्यांना फार अस्वस्थ वाटत होतं. त्यांना मनातून सारखं असं वाटत होतं की खोटं बोलायला नको होतं. गांधीजींनी आपला अपराध मान्य केला आणि घडलेलं सर्व काही आपल्या वडिलांना एका कागदावर लिहून सांगितले. गांधीजींनी विचार केला की आता बाबा माझ्या या चुकीसाठी मारतील मला शिक्षा देतील, परंतु त्यांच्या बाबांनी असे काहीही केले नाही.

ते पत्र वाचतातच त्यांच्या डोळ्यातून घळ-घळ अश्रू वाहू लागले. गांधीजींना या गोष्टी पासून फार वाईट वाटले. त्यांना जाणीव झाली की प्रेम हिंसापेक्षा अधिक प्रभावशाली आहे.

## जीवन का अमृत (भाग १)



प्रेम, दया और धैर्य दिखाने से हमेशा फायदा होता है। आप प्रेम पूर्वक एक दूसरे की सेवा करें, ताकि दूसरे लोग जान सके और स्वयं देख सकें कि आप किसी जिंदा महापुरुष से जुड़े हैं, जिसने आपके अंतर में निज घर वापिस जाने का दिव्य दरवाजा खोल दिया है।

रूहानियत किसी एक धर्म की बपौती नहीं है। इससे कोई फर्क नहीं पड़ता कि आप किस

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

धर्म से संबंधित हैं। आइये, हम सब प्रभु की सेना में भरती हों, जिसमें भरती के लिए सदाचार की योग्यता चाहिए, जिसमें नेक विचार, नेक बोली और नेक कर्म शामिल हों।

मैं चाहता हूं कि हर एक निर्मल और पवित्र जिंदगी जीए, ऊँचे मंडलों में उड़ान भरे और इसी जिंदगी में बाहरी और आंतरिक, दोनों तरफ शांति और सुरक्षा का लुत्फ उठाएँ और अंत में अपने सच्चे निज घर पहुँचे। यह उम्मीद करना कि नामदान के बाद आपकी सांसारिक जिंदगी के काम-काज इस तरह से बदल जायेंगे कि आपको कड़वी चीजों का। पिछले कर्मों के फलस्वरूप सामना नहीं करना पड़ेगा, बिल्कुल गलत जिंदगी में उतार-चढ़ाव तो जरूर आयेंगे। उनका सामना करके, उनका हिसाब चुकाना होगा। अगर हम उनसे दूर भागेंगे, तो हमारा कर्ज नहीं उतरेगा।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

साधना वा शांति, प्रेम, सुख वा दया के संकल्पों से मेलाटोनिन पैदा करने वाली कोशिकायें शक्तिशाली बन जाती हैं और उन से उत्पन हार्मोन द्वारा मानसिक संकल्पों में निर्माण की शक्ति इतनी बढ़ जाती है कि महापुरुषों की दृष्टि पड़ते ही लोग बदल जाते हैं।

साधना वा तप से मेलाटोनिन हार्मोन की गुणवता और मात्रा बढा कर कोई भी व्यक्ति सिर्फ

### आज्ञा चक्र

संकल्प मात्र से, किसी का दुःख नष्ट कर सकता है, बीमार को सोचते ही ठीक कर सकता है। मनचाहे निर्माण कर सकता है। किसी का हाथ पैर या कोई अंग कट जाये या टूट जाये, उस पर दृष्टि डालते ही ठीक कर सकते हैं। अभी यह कल्पना लगता है परंतु शोध का विषय है क्योंकि साधना की यही महिमा है।

आज्ञा चक्र

पीनियल ग्रंथि -मेलाटोनिन -आंखे

हमारी आंखे मन की डायरेक्ट कर्म इन्द्रिय हैं। आंखे मन का स्थूल रूप हैं। विचार सूक्ष्म शक्ति है वह दिखाई नहीं देते। मनुष्य की

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## साहित्य सहवास - 'मैत्री'

सात अजूबे इस दुनिया में आठवी अपनी जोडी आणि ये दोस्ती हम नही तोडेंगे. मैत्री ह्या विषयावरिल गाणी ऐकतंच रहावीत अशी आहेत. आपल्या आचार, विचारांसोबत ज्यांचे आचार, विचार जुळतात त्यांच्याशी आपली मैत्री होते.

मनुष्य जीवनात लाभलेलं एक छानसं नातं, मैत्रीचं नातं रक्तनातं जपतो अगदी तसंच जपायचं असतं. मित्र ह्या शब्दाची व्याख्याच मुळात 'मी'पणाचा त्याग करुन जो आपल्याशी नातं जोडतो तो. आपल्या मनातलं गुपित आपण मित्र-मैत्रिणीला सांगतो, तसचं सुख आणि दुःखातही त्यांना सहभागी करुन घेतो. कारण मैत्रीला वय, जात, धर्म ह्याचं बंधन नसतं. मैत्रीच्या नात्यामध्ये तरुण मुलगा व तरुण मुलगी ह्यांची मैत्री असूच शकत नाही असं बऱ्याच जणांना वाटतं. त्यांच्यात फक्त शारीरिक आकर्षण असेल असा एक गैरसमज आहे. पण खरंतर युवक व युवती एकमेकांचे फार चांगले मित्र आहेत, असु शकतात हे कॉलेजमध्ये लक्षात येतं. म्हणतात ना मनुष्य हा त्याच्या मित्र परिवारावरुन ओळखला जातो. आपण ज्या मित्र-मैत्रिणींच्या सहवासात राहतो, ह्यावरुनच आपली खरी ओळख होते. म्हणूनच चांगले आचार-विचार असणारे मित्र-मैत्रिणी मिळणं भाग्याचं असतं आणि अशी ही मैत्री आयुष्याला योग्य दशा आणि दिशा देणारी असते. आपण ज्यांच्या सहवासात बराच काळ असतो, त्यांचे गुण तर कधी अवगुणसुध्दा आपण कळत-नकळतपणे आत्मसात करत असतो. पर्यायाने आपणही तसंच घडतो, घडत आहोत हे आपल्या लक्षात येतं.

आई आणि मुलगी, वडील आणि मुलगा यांच्यामध्येही निखळ मैत्री असायला हवी आहे. कारण मैत्रीच्या या मनमोकळ्या नात्यामुळे मुलगा अथवा मुलगी आई अथवा वडिलांपासून कोणतीही गोष्ट लपवून ठेऊ शकणार नाही. पर्यायाने हे नातं अधिकाधिक दृढ होईल. महाराष्ट्राचे वाचकप्रिय फॅमिली लेखक म्हणून सर्वदूर परिचित असलेले वपू काळे लिहितात. 'आपला मुलगा अथवा मुलगी, मनातलं गुपित मित्र - मैत्रिणीजवळ सांगत असेल तर आई बापाने तो स्वतःचा पराभव समजावा. कारण आपण आपल्या पाल्याशी मैत्रीचं नातं निर्माण करु शकलो नाही हे सिध्द होतं.' खरं तर मैत्रीच्या नात्याइतका मनमोकळेपणा कोणत्याच नात्यामध्ये नसतो. पण एक मात्र खरं आहे मैत्रीमध्ये पैश्यांचा व्यवहार आला की मैत्रीला ग्रहण लागलंच म्हणून समजा. म्हणूनच मैत्री ही निखळ, निःस्वार्थी असणं गरजेचं आहे. आणि असायलाच हवी आहे. संशय, व्यसन, मुलगा अथवा मुलगी, पैसा, लोभ इत्यादीसारख्या कारणां मुळे मैत्री तुटू शकते हे मात्र निश्चित. काही व्यक्ती स्वार्थासाठी मैत्री करतात. अशांना वेळीच ओळखलं पाहिजे.

मैत्री फक्त माणसांशीच होते असं नाही तर पुस्तकं, निसर्ग, पक्षी, प्राणी, फुलं ह्यांच्याशीही होऊ शकते नव्हे तर होत असते, व्हायला हवी आहे. पुस्तकांमधील चांगले विचार आपल्यामध्ये चांगले बदल घडवू शकतात. निसर्गाच्या सहवासात आला की डोंगर, झाडं, वेली मनुष्याला देण्याचं कार्य करतात हे लक्षात येतं. देत राहा म्हणजे तुम्हांस निश्चितच मिळेल हा निसर्गाच्या मैत्रीचा अर्थ आहे. रंगीबेरंगी फुलं आपलं लक्ष वेधून घेतात, फुलांपासून सुगंध मिळतो. तुमच्या सहवासात येणाऱ्यांना तुमच्या अस्तित्वाने आनंद मिळवून द्या असाच फुलांशी मैत्रीचा अर्थ निघतो. पूर्वी पेन फ्रेंड असायचे सध्या फेसबुक फ्रेंड आहेत. नगरचा अष्टपैलु कलाकार अमोल बागुल सरांनी नोटांच्या सहा अंकी नंबरला दोन हा अंक जोडून त्या क्रमाकांवर फोन करुन मैत्रीचं नातं जोडलं. एक वेगळी संकल्पना अमोल सरांनी राबवून मैत्रीची व्याप्ती वाढवली हे निश्चितच कौतुकास्पद आहे. आज मी ठामपणे सांगू शकतो की मलाही चांगले मित्र-मैत्रिणी भेटल्या, माझ्यातले गुण, अवगुण त्यांनी मोकळेपणाने मला सांगितले. मी त्यांच्याप्रमाणे वागलो म्हणून आज निश्चित अशा एका शिखरापर्यंत आलो आहे. माझ्या या यशात मित्र-मैत्रिणींचा नक्कीच सिंहाचा वाटा आहे. तुमच्याही आयुष्यात असेच मित्र-मैत्रिणी असाव्यात. सूर्य, चंद्र अन् माणसाचं अस्तित्व पृथ्वीवर आहे, तोपर्यंत मैत्रीचं नातं टिकून राहणार आहे.

गेट टुगेदरच्या निमित्ताने अनेक वर्षांनी मित्र, मैत्रिणी एकत्र येतात. चांगल्या अनुभवांचं आदान-प्रदान होतं. शाळेसाठी अथवा एखादा मित्र, मैत्रीण यांची गरज ओळखुन आर्थिक सहकार्य करतात. जे केलं ते आपलं मैत्रीतलं कर्तव्य असं ते मानतात. मैत्रीतलं कर्तव्य, जबाबदाऱ्या पार पाडल्याच पाहिजेत.

(लेख क्र.५५५)

- **सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

## हसा आणि शतायुषी व्हा!

एक मुलगा टॅटू काढत होता आणि रडत होता, तेव्हा एक माणूस म्हणाला, 'भाऊ, तुम्हाला वेदना सहन होत नाहीत तर तुम्ही टॅटू का काढत आहात?'
मुलगा : मी वेदनेमुळे रडत नाहीये, भाऊ मला करीना लिहायचे होते, पण त्या हरामीने 'मरीना' लिहिले

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* मोहंमद अल बसीर यांची कोणत्या देशाच्या कार्यवाहक पंतप्रधानपदी निवड झाली? - सिरिया

- **अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

त्यामधून पातळसर पांढरा द्रवपदार्थ बाहेर येत असला, तरी ते बालिकेच्या शरीरातील संप्रेरके (हार्मोन्स) कमी होत असल्याचे द्योतक असते. यासाठी कुठलाही उपाय करण्याची गरज नाही. काही दिवसांनंतर ते आपोआप कमी होते. जन्मतःच काही बालिकांना योनिमार्गाद्वारे पाळीसारखे रक्त जाणे नैसर्गिकच असते. शरीरातील संप्रेरके कमी-जास्त होण्यामुळे हे घडते.

----------------

### वाढदिवस कसा साजरा करावा?

स्वप्नालीला लग्नानंतर नऊ वर्षांनी विराज झाला होता. अथक प्रयत्नानंतर माझ्या आयुर्वेदिक औषधोपचाराने ती गर्भवती राहिली होती. विराजच्या जन्मानंतर सर्व कुटुंब आनंदी झाले होते. विराजच्या पहिल्या वाढदिवसाची निमंत्रण पत्रिका द्यायला स्वप्नाली आवर्जून हॉस्पिटलला आली होती. 'डॉक्टर, तुमच्या प्रयत्नांमुळेच मी आई होऊ शकले. त्यामुळे तुमचा आशीर्वाद विराजसाठी फार मोलाचा आहे. तेव्हा नक्की तुम्ही त्याच्या वाढदिवसाला या!' रविवार असल्यामुळे व तिच्या आग्रहाच्या निमंत्रणामुळे मी दुर्वा-अंकुरसह वाढदिवसाला उपस्थित राहिले. वाढदिवस मोठ्या हॉटेलमध्ये आयोजित केला होता. अनेक नातेवाइकांची, मित्र-मंडळींची उपस्थिती होती. मोठ्या आवाजामध्ये संगीत लावलेले होते. लहान मुले इकडून तिकडे पळत होती.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बांधकाम क्षेत्रात काळानुरूप झालेल्या बदलाचा आढावा










एखाद्या इमारतीचे बांधकाम करताना प्लॉट सफाई, खड्डे खोदाईपासून फायनल फिनिशिंगपर्यंत विविध प्रक्रिया केल्या जातात. यामध्ये मागील वीस–पंचवीस वर्षात पुष्कळ बदल आपणास अनुभवयास मिळाले असतील याचाच उहापोह आजच्या लेखात करणार आहोत. इमारतीचे काम करताना वेगवेगळ्या टप्प्यामध्ये ते केले जाते, त्यात या काळात काय बदल अथवा सुधारणा झाल्या आहेत ते आता आपण पाहू.

**लाईन आऊट :** कुठल्याही स्ट्रक्चरच्या कामाची सुरुवात लाईन आऊटने होते. पारंपारीक पद्धतीने काम करताना सुरुवातीला प्लॉटची लांबी रुंदी वरून कर्ण काढून प्लॉटवर बॉर्डर मारून आर्कीटेक्चरल सेंटर लाईन प्लॅनप्रमाणे लाईन आऊट केले जाई. परंतु आता छोट्या कामातही लाईन आऊटसाठी टोटल स्टेशन मशीनचा वापर यासाठी केला जातो तसेच प्लेन टेबल सर्व्हे, डम्पी लेव्हल मशीन, थेडोलाइट, रोव्हर मशीन अश्या विविध मशिनरीचा वापर यासाठी केला जातो. यामुळे कामाची अचूकता वाढते तसेच वेळ आणि खर्ची लागणारे मनुष्यबळ यात विशेष बचत होते.

**खोदाई काम :** आधीच्या काळात खड्डे अथवा पाया खोदाईसाठी वडारी टोळ्यांचा मुख्यत्वे वापर होत असे. आता पोकलन, जेसीबी, जेसीबी ब्रेकर, ट्रॅक्टर ब्रेकर, हॅण्डब्रेकर अश्या मशीनरीमुळे खड्डे खोदाई मुरूम भराई सोपी झाली असून, ट्रॅक्टर, डंपर यांच्या वापराने मटेरीअल वाहतूक जलद आणि कमी खर्चात शक्य झाली आहे. प्लिंथमध्ये भरलेला मुरूम दबाईसाठी पूर्वीहॅण्डधुम्मसचा वापर होत असे. आता छोट्या बंगल्याच्या कामामध्येही धुम्मस मशीन,कॉम्पॅक्टर, रोलर, हायड्रोलिक स्ट्रोक रोलरचा वापर केला जातो.

**पाईल फाउंडेशन :** पूर्वी पाईलसाठी मनुष्य बळाचा वापर करून गिरमीटच्या सहाय्याने जमिनीत पायासाठी ड्रिलिंग केले जात असे. यासाठी महिना महिना काम चालत असे. आता फ्रिक्शन पाईल आणि एंड बिअरिंग पाईलसाठी विविध मशिनरी आणि एजन्सी मार्केटमध्ये उपलब्ध आहेत, त्यामुळे हे काम सहज साध्य, वेगवान आणि वेळेची बचत करणारे झाले असून, बहुमजली इमारतीमध्ये याचा उपयोग अतिशय फायदेशीर ठरत आहे.

**आरसीसी कॉंक्रीट काम :** वीस पंचीवीस वर्षापूर्वीच्या काळात कॉंक्रीट कामात कॉंक्रीट मिक्सरचा मर्यादित वापर असल्याने तसेच स्लॅब भरण्यास परास बांधून हातावर घमेल्याने कॉंक्रीटवर घेऊन स्लॅबकास्ट केला जात असे. आता त्यामध्ये बदल होऊन अगदी फुटिंग, पाईल, बेड कॉंक्रीट, बीम आणि स्लॅब भरण्यास मिक्सर तसेच लिफ्ट मशीनचा वापर केला जातो. तसेच स्लॅबवर कॉंक्रीट मटेरीअल वाहतुकीस लोखंडी गाड्यांचा वापर करून कॉंक्रीट कामास गती दिली जाते.

**आर एम सी कॉंक्रीट :** रेडी मिक्स कॉंक्रीट प्लांटच्या माध्यमातून आपणास हव्या त्या कॉंक्रीट ग्रेडचे टेस्टिंग लॅबमध्ये मटेरीअल आणि विविध चाचण्या करून मिक्स डिझाइनचे प्रमाण फायनल करून नियंत्रित वातावरणात वे बॅचिंगचा वापर करून उच्च ग्रेडचे कॉंक्रीट फॅक्टरी अथवा प्लांटवर बनवितात. हे चांगल्या क्वालिटीचे कॉंक्रीट ट्रान्झिट मिक्सरचा वापर करून कामाच्या ठिकाणी म्हणजेच साइट वर आणले जाते तसेच बहुमजली इमारतीमध्ये पंपचा वापर करून कॉंक्रीट केले जाते.

**सेन्टरिंग कामातील आधुनिकता आणि अचूकता :** सेन्टरिंग कामामध्ये आधीच्या काळात प्लेट, मुंडे, लाकडी वासे, बांबू, सिल्व्हर अथवा जंगली लाकडातील बॉटम यांचा प्रामुख्याने वापर होत असे. आताच्या काळात त्यात अचूकता आणि गुणवत्ता वाढीसाठी लोखंडी साहित्याचा जास्त वापर होतो. त्यामध्ये एक्रो, स्पॅन, प्रॉप, वेलर्स, चेक नट, सिकंजे यांचा वापर करून चांगल्या क्वालिटीचे आणि फिनिशिंगचे कॉंक्रीट स्लॅब करणे शक्य आहे. कप लॉक सिस्टीमचा सेंटरींग कामात अवलंब केल्यास आणखी दर्जेदार आणि जलद काम साध्य होते. सेन्टरिंग कामात प्लेटऐवजी प्लायवूडचा वापर केल्यास स्लॅब लेव्हल आणि फिनिशिंगमध्ये कमालीची सुधारणा होते. बहुमजली इमातीमध्ये Mi - van (मी वान) शटरींग जी अॅल्युमिनीअममध्ये असते. याचा वापर पुणे, मुंबईसारख्या शहरात करून अगदी कमी कालावधीमध्ये या बहुमजली इमारती पूर्ण केल्या जातात. यामध्ये पंप कॉंक्रीट बरोबरच आवश्यक त्या ठिकाणी गरजेप्रमाणे बुमचा वापर करून कॉंक्रीट केले जाते. सेन्टरिंग मटेरीअल आणि इतर बांधकाम साहित्य उंचीवर नेण्यासाठी लिफ्ट तसेच अत्याधुनिक क्रेनचा वापर आपल्याला शहरातील मोठ्या इमारतीच्या चालू असलेल्या कामामध्ये होताना दिसत आहे.

**स्टील कटिंग आणि वापरातील सुधारणा :** साईटवर स्टील कटिंगसाठी काही वर्षापूर्वी छन्नी आणि घन यांचा वापर नियमित केला जात असे तसेच स्टील बारला एल मारण्यासाठी अथवा बार बेंड करण्यासाठी कॉंक्रीटमध्ये मोठ्या जाडीचे बार गुंतवून ठिया करावा लागत असे. आता स्टील कटिंगसाठी कटर मशीन आणि बेंडिंगसाठी कट अँड बेंड मशीनचा वापर केला जातो. तसेच स्टील कंपनीकडून आपल्याला आवश्यक मापातील स्टील स्पेशल ऑर्डर देऊन मागवता येते. याचबरोबर विविध साईज मधील आणि आकाराच्या बीम रिंगा आपण कंपनीकडून मागवू शकतो, ज्यामुळे वेस्टेजचे प्रमाण कमी होऊन कामाचा साईटवर जाणारा वेळही वाचण्यास मदत होते.

**लेबर सेफ्टीस प्राधान्य :** बहुमजली इमारतींची कामे करताना लेबर सेफ्टीस मुख्यत्वे प्राधान्य देताना हेल्मेट, सेफ्टी बेल्ट, सेफ्टी रोप यांचा वापर केला जातो. तसेच उंचीवर काम करताना बिल्डींगला सेफ्टी नेट लावणे बंधनकारक केले जाते. खास करून सेन्टरींग काम, बाहेरील प्लास्टर, पेंटिंग आणि प्लंबिंग काम करताना यांचा वापर बंधनकारक केला जातो. मोठ्या कन्स्ट्रक्शन कंपन्याबरोबरच आता छोट्या बांधकामांमध्ये यासाठी विशेष काळजी घेतली जाते आणि यावर लक्ष ठेवणारे सुपरवायजर नियुक्त केले जातात. सदर लेबर एजन्सी कॉन्ट्रॅक्टरच्या सर्व काम करणाऱ्या लेबरचा इन्सुरन्स काढणे सक्तीचे आहे. जेणेकरून काम करताना काही अपघात झाल्यास पुढील उपचार अथवा नुकसान भरपाईस त्याचा उपयोग होतो.

**पीएमसी कन्सल्टंट व एमईपी कन्सल्टंटची प्रोजेक्टवर नियुक्ती :** मोठ्या इमारतींच्या कामामध्ये योग्य पद्धतीने काम होण्यासाठी तसेच भविष्यात होणारे कामातील नुकसान आणि तोडफोड टाळण्यासाठी वेगवेगळ्या काम करणाऱ्या एजन्सी–मधील समन्वय, कामातील सुसूत्रता यासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट टीमची नियुक्ती केली जाते. तसेच मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व प्लंबिंग कामाची योग्य आखणी करण्यासाठी एमईपी कन्सल्टंटची प्रोजेक्टवर नियुक्ती केली जाते. जेणेकरून हे काम योग्य नियोजनाने आणि पुढील वापरण्याच्या काळात कमीत कमी मेंटेनन्सने सुरळीत व्हावीत. आता छोट्या प्रोजेक्टवरसुद्धा या कन्सल्टंट टीमची नियुक्ती केली जाते, ज्यामुळे दर्जेदार कामांची संख्या वाढत आहे.

**पी टी स्लॅब आणि पी टीबिमची स्ट्रक्चर :** शहरातील बहुमजली इमारती तसेच पार्किंग, वाणिज्य आणि रहिवास अशी एकत्र असणारे प्रोजेक्ट जिथे पार्किंगसाठी कॉलमचे बिल्डींगमध्ये असणारे अडथळे कमी असणे अपेक्षित असतात अथवा दोन कॉलम–मध्ये जास्त अंतर असणे गरजेचे असते. कॉलमची ग्रीड बऱ्याच मजल्यावर प्लॅनप्रमाणे बदलून स्टफ अथवा फ्लोटिंग कॉलम आर सी सी डिझाइनमध्ये येतात, अशा ठिकाणी आर सी सी डिझायनर आर्किटेक्टबरोबर समन्वय साधून पी टी स्लॅब आणि बिम डिझाइन करून देतात. यामुळे पार्किंगसाठी प्रशस्त जागा उपलब्ध होते तसेच वाणिज्य आणि रहिवास असलेल्या इमारतीमध्ये योग्य प्रकारे प्लॅनिंग आणि कन्स्ट्रकशन करणे सहज साध्य होते.

**सॉफ्टवेअरचा वापर :** बिल्डींग प्लॅनिंगपासून, फायनल झाल्यानंतर मेंटेनन्स, लिफ्ट वापर, कार पार्किंगपर्यंत विविध सॉफ्टवेअरचा वापर आताच्या काळात वाढला आहे. प्लॅनिंगसाठी ऑटो कॅड, थ्री डी व्ह्यू साठी थ्री डी मॅक्स, स्केच अप, आर सी सी डिझाइन अॅनालिसिससाठी विविध सॉफ्टवेअर वापरले जातात तसेच मटेरीअल क्वांटीटी काढण्यासाठी, इंटेरीअर डिझाइन, लँडस्केप, मॉडेलिंगसाठी, एम ई पी आणि पी एम सी साठीही विविध वेगवेगळे सॉफ्टवेअर वापरून योग्य प्लॅनिंगने कामे करण्यास मदत होते. प्रोजेक्टचे मार्केटिंग करण्यास त्यांची विक्री करण्यास विविध सॉफ्टवेअरचा आणि सोसिअल मिडियावरील विविध साधनांचा वापर वाढला आहे. यामुळे ग्राहकांना विविध पर्याय उपलब्ध होऊन त्यांना तुलना करणे आणि आपल्या गरजेप्रमाणे योग्य फ्लॅट, बंगला, शॉप यांची निवड करणे सोपे झाले आहे.

**पेंटिंग काम :** पूर्वी पेंटिंग काम करण्यासाठी मर्यादित साधने उपलब्ध होती. आता स्प्रे मशीन कॉम्प्रेसर तसेच पेंट मटेरीअल योग्य पद्धतीने मिक्स करण्यासठी मशीन उपलब्ध आहेत. कामावर सफाईसाठी ब्लोअर, कॉम्पुटरच्या सहाय्याने विविध छटा आता सॉफ्टवेअरच्या माध्यमातून बनवता येतात तसेच थ्री डी माध्यामतून वेगवेगळे कलर शेड इमारतीसाठी आधी चेक करून फायनल करणे शक्य झाले आहे. कलरमध्ये सुद्धा ड़ॅम्पप्रुफ, वेदर कोट अश्या वॉटर प्रुफ कोटचे जास्त आयुष्य असलेले विविध प्रकार आता उपलब्ध झाले आहेत.

**वॉटर प्रूफिंग :** बेसमेंट, टॉयलेट, बाथरूम, किचन, टेरेस, बेसिन, पॅरापेट आणि बिल्डींगमध्ये पाण्याचा स्रोत असणारी ठिकाणे या जागी वॉटर प्रूफिंग कामाची विशेष काळजी घेतली जाते. विविध कंपन्याचे बाँड पेपरवर हमी देणारे केमिकल आणि त्यांचा तांत्रिक पद्धतीने वापर करणाऱ्या टीम आता उपलब्ध आहेत. त्याचबरोबर विशेष प्रशिक्षित असलेल्या मार्केटिंग टीम यासाठी मार्गदर्शन आणि डेमो सादर करतात. कमीत कमी मेंटेनन्स साठी काम चालू असताना वॉटर प्रूफिंग कामांकडे विशेष लक्ष देणे आताच्या काळात गरजेचे झाले आहे.

**लिफ्ट आणि कार पार्किंग :** बहुमजली इमारतीबरोबरच छोट्या कॉम्प्लेक्स अथवा बंगल्यां–मध्ये लिफ्ट वापरण्याचे प्रमाण वाढले असून, यासाठी विविध ब्रांडेड आणि लोकल कंपन्या उपलब्ध असून लिफ्ट बसविल्यानंतर सेवा देण्यास त्यांचे प्रतिनिधी उपलब्ध असतात. कार पार्किंग हा शहरातील इमारतीमध्ये ट्रॅफिकची गुंतागुंत वाढविणारा प्रश्न ठरत आहे. त्यासाठी विविध आधुनिक मेकॅनिकल तंत्रज्ञानाचा आणि डिझाइनचा वापर करून ते सुरळीत करणे शक्य झाले आहे.

**लँडस्केप आणि इंटेरीअर :** पूर्वीच्या १५–२० वर्षाआधी कमी महत्व दिलेलं अथवा दुर्लक्षित असलेल्या इंटेरीअर कामास आता अगदी छोट्या बंगल्यातच नाही तर पान टपरीपासून कुठल्याही प्रकारच्या छोटय मोठ्या आस्थापनेत महत्व वाढले आहे. यासाठी आर्किटेक्ट आणि इंटेरीअर डिझाइनर त्या बंगला अथवा आस्थापनेतील छोट्यात छोट्या जागेचा चांगल्या प्रकारे डिझाइन करून उपयोग वाढविणे, योग्य प्रकारे रंगसंगती घेणे. वेगळ्या थीम वापरून काम करणे आणि या माध्यमातून त्या स्पेस चा चेहरा मोहरा बदलण्याचे काम करतात. त्याचप्रमाणे लँडस्के पहा आता कुठल्याही इमातारीचा अविभाज्य भाग झाला आहे. योग्य प्लॅनिंगने लँडस्केप आर्किटेक्ट अगदी छोट्यात छोट्या स्पेसचे डिझाइन करतात, ज्यामुळे इमारत, बंगले अथवा कुठलीही आस्थापना निसर्गाच्या अगदी जवळ जाणारी ठरते. बाहेरील गार्डन आणि इतर भागातील लँडस्केप बरोबर अंतर्गत जागेतही लँडस्केप कामास विशेष पसंती दिली जाते, त्यामुळे लँडस्केप आणि इंटेरीअर याकडे नागरिकांचा कल वाढला असून, त्यास महत्व प्राप्त झाले आहे.

मागील वीस पंचवीस वर्षामध्ये बांधकाम क्षेत्रातील प्लॅनिंग, एक्झिक्युशनआणि त्यासाठीचे दिवसेंदिवस विकसित होणारे आधुनिक तंत्रज्ञान यांचा वापर कामामध्ये सुधारणा आणि बदल करण्यास होत आहे. मनुष्य हा कृतीशील आणि क्रियाशील प्राणी असून वेगवेगळे स्थित्यंतरे आणि बदल यावर तो काम करत असतो आणि त्यातून नवीन गोष्टी आत्मसात करत असतो. शहरातील इमारती या त्या शहराची ओळख आणि मनातील स्थान अधोरेखित करत असते आणि ते घडविण्याचे काम आर्किटेक्टस इंजीनिअर्स करत असतात. आर्किटेक्ट इंजीनिअर्स आपल्यात नसतील तरी त्यांनी केलेली कामे वास्तूच्या रुपात त्यांच्या प्रतिभेची जाणीव शेकडो वर्षे आपणास करून देतात. वास्तूच्या रुपात अनेकांचे घरे उभारण्याचे आणि त्यांचे स्वप्नातील घर सत्यात उतरविण्याचे काम यांच्याकडून होते त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बांधकाम क्षेत्रात झालेले बदल स्वीकारून पुढे जाण्यास आणि गरजेप्रमाणे त्यांचा अवलंब करणे हि काळाची गरज आहे.

**इंजिनिअर – इंजि. प्रदिप मधुकर तांदळे**
**(एसा संचालक)**
BE Civil , AMIE, AIV, CE, LLb,
DLL & LW, DADR, PGDBM, MBS, MOV
मेल आय डी –pradiptandale78@gmail.com

फर्म – श्रद्धा बिल्डकॉन
ऑफिस पत्ता – ऑफिस नं. २, पहिला मजला, सेक्टर नं. ४, एम आर ट्रेड सेंटर, वाडिया पार्क, माळीवाडा, अहिल्यानगर,
मोबा. ८०८७७५२७४०.

आर्किटेक्टस, इंजिनिअर्स ॲण्ड सर्व्हेअर्स असोसिएशन, अहिल्यानगर
www.aesanagar.com
AESA

# ‘पॉलिटेक्निक’च्या प्रवेश प्रक्रियेला तंत्रशिक्षण संचालनालयाने दिली २६ जूनपर्यंत मुदत वाढ

नगर – राज्य तंत्रशिक्षण विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करीता होणा–या पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेसाठी मुदत वाढ दिली असून त्याबाबतची अधिसूचना संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आली आहे. त्यानुसार प्रथम वर्ष पदविका प्रवेशासाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २६ जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्या मार्गदर्शनाखाली पॉलिटेक्निक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर मुदत वाढीचा लाभ जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन डॉ. गोरक्ष गर्जे, मा. सहसंचालक, नाशिक विभाग यांनी केले आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यासाठी यंदा पदविका प्रवेशासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रथम वर्ष प्रवेशासाठी आजपर्यंत जवळपास ८६०० पेक्षा जास्त विध्यार्थ्यांनी नोंदणी अर्ज केला आहे, अशी माहिती शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य तथा जिल्हा नोडल अधिकारी डॉ. अजय आगरकर यांनी दिली आहे.

प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमासाठी अहिल्यानगर जिल्ह्यात ७ हजाराहून अधिक जागा आहेत. या जागांवर प्रवेश मिळवण्यासाठी दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरु आहे. दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाच्या पदविका अभ्यासक्रम ांचा ही पर्याय उपलब्ध होत असून विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज ऑनलाईन भरायचे आहेत. ऑनलाईन अर्ज करताना प्रथम तंत्रशिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर ऑनलाईन अर्ज भरून आवश्यक कागदपत्रांच्या स्कॅन छायाप्रती अपलोड कराव्यात. ऑनलाईन पद्धतीमध्ये E- Scrutiny , Physical Scrutiny असे दोन पर्याय आहेत.

मागील दोन शैक्षणिक वर्षात शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर येथे कॅम्पस मुलाखतीमध्ये ३०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांची निवड विविध नामांकित कंपनी मध्ये झाली असून त्यांना ३.७५ लाखापर्यंतचे वार्षिक वेतन मिळाले आहेत. तसेच कॅम्पस मुलाखतीची प्रक्रिया अजूनही सुरु असून प्रत्येक पात्र विद्यार्थ्याला नौकरीच्या विविध संधी शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर उपलब्ध करून देत आहेत, अशी माहिती प्रशिक्षण आणि अस्थापना अधिकारी श्री. बडेकर यांनी दिली आहे.

शासकीय तंत्रनिकेतन अहमदनगर येथे प्रथम वर्ष (First Year Diploma) या अभ्यासक्रमासाठी सुविधा केंद्र तसेच समुपदेशन कक्ष कार्यान्वित असून अर्ज करताना काही अडचण आल्यास प्रा. बडेकर (९४२१३३५२९०) व प्रा. चौधरी (९६३७१५२३८७) यांच्याशी स.१० ते सायं. ६ यावेळेत संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेशाचे वेळापत्रक

ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी व अर्ज निश्चिती : २६ जूनपर्यंत.


तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिद्ध होणार : २८ जून

गुणवत्ता यादीवरील आक्षेप नोंदवणे : २९ व ३० जून

अंतिम गुणवत्ता यादी प्रसिद्ध : ०२ जुलै

कॅपच्या फेरींकरिता विकल्प अर्ज (Option Form) भरणे, कॅप जागावाटप, जागा स्वीकृती करणे, उमेदवाराने वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर घोषित केले जाईल आणि ते https://poly25.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

# ‘इरकॅड’ च्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत नगरचे डॉ. ऋषिकेश पंडित यांना ‘फॅकल्टी’चा बहुमान


'इरकॅड'च्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत डॉ. ऋषिकेश पंडित यांना 'फॅकल्टी'चा बहुमान मिळाला.

नगर – स्त्रीरोग चिकित्सेतील दुर्बिणीद्वारे केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियांच्या (लॅप्रोस्कोपी ॲण्ड हिस्टरोस्कोपी) प्रशिक्षणासाठी आणि संशोधनासाठी जगभरात नावाजलेली आंतरराष्ट्रीय संस्था म्हणून इरकॅडची (आयआरसीएडी) ओळख आहे. फ्रान्समधून सुरू झालेल्या या संस्थेची अनेक देशांमध्ये केंद्रे आहे. याठिकाणी दुर्बिणीद्वारे केल्या जाणाऱ्या शस्त्रक्रियांचे अद्ययावत प्रशिक्षण दिले जाते.

या संस्थेने इंदौर (मध्य प्रदेश) येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय गायनेकोलोजिक लेप्रोस्कोपी व हिस्टरॉस्कोपी ट्रेनिंग कार्यशाळेत अहिल्यानगरचे स्त्रीरोग तज्ञ डॉ. ऋषिकेश पंडित यांना 'फॅकल्टी' म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. हा अहिल्यानगरसाठी अत्यंत अभिमानाचा क्षण होता.

या कार्यशाळेदरम्यान डॉ. पंडित यांनी काही महत्त्वाच्या लेप्रोस्कोपीक शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पाडल्या. जगभरातून आलेल्या नामांकित स्त्रीरोग तज्ञांनी त्यांच्या कौशल्याची प्रशंसा केली आणि त्यांना विशेष पुरस्काराने सन्मानित केले. या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये देशातील २० हून अधिक गायनेकोलोजिक सर्जन्सना दुर्बिणीच्या शस्त्रक्रियांचे प्रशिक्षण देण्यात आले. अहिल्यानगरच्या एका डॉक्टरांना आंतरराष्ट्रीय स्तरावर हा सन्मान मिळणे, हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

डॉ. ऋषिकेश पंडित हे अहिल्यानगरमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आणण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात. त्याचाच एक भाग म्हणून, त्यांचे नवे ३डी लेप्रोस्कोपी सेंटर लवकरच शहरात सुरू होत आहे. यामुळे अहिल्यानगर व एकूणच इतर भागातील महिलांना अत्याधुनिक दुर्बिणीद्वारे होणाऱ्या शस्त्रक्रियांचा लाभ घेता येणार आहे. डॉ. पंडित यांच्या या प्रयत्नांमुळे स्त्रीरोग चिकित्सेच्या क्षेत्रात अहिल्यानगरचे नाव अग्रस्थानी आहे.

# ‘ब्लॉसमिंग ऑलमंड’ या मराठी चित्रपटाची ११ व्या सोल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी निवड




नगर – ‘ब्लॉसमिंग ऑलमंड’ या मराठी चित्रपटाची दक्षिण कोरियात होणाऱ्या ११ व्या सोल आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी अधिकृतपणे निवड करण्यात आली आहे. या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन निहाल एस. घोडके यांनी केले आहे. कथा, पटकथा आणि संवादही त्यांनीच लिहिले आहेत. अनंत काळे यांनी स्क्रिप्ट सल्लागार म्हणून काम पाहिले आहे. सिनेमॅटोग्राफीचे काम सचिन गायगोवे यांनी पार पाडले, तर संपादनाची जबाबदारी अमोल सुरुणकर यांनी सांभाळली आहे. या चित्रपटात मनीषा मोरे, पुरुषोत्तम उपाध्ये, एन. के. गर्जे, जानवी लटके, अंजली कोंडावार, रावसाहेब अलकुटे आणि प्रणित मेढे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सहयोगी दिग्दर्शक म्हणून अमोल सुरुणकर, तर सहाय्यक म्हणून मयूर आहेर, कराळे शुभ आणि रिझवान सय्यद यांनी योगदान दिले आहे. प्रकाशयोजनेची जबाबदारी सचिन गायगोवे, दिनेश सुतार आणि रिझवान सय्यद यांनी सांभाळली आहे. तर पोशाख आणि मेकअप विभागात श्रेया गायकवाड, अपूर्वा काकडे आणि सोनिया लोटके यांचा सहभाग आहे.

ध्वनी विभागात शुभम कराळे आणि दिनेश सुतार यांनी काम पाहिले असून, कास्टिंग टीममध्ये निवृत्ती गर्जे आणि पुरुषोत्तम उपाध्याय यांचा समावेश आहे. कार्यकारी निर्माते म्हणून अमोल के. सुरुणकर आणि निहाल एस. घोडके कार्यरत आहेत.

हा चित्रपट आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचल्याने संपूर्ण टीममध्ये आनंदाचे वातावरण आहे. हा टप्पा त्यांच्या चित्रपट प्रवासातील महत्त्वाचा मैलाचा दगड ठरत आहे.

# गुरुवर्य बत्तिन यांनी पद्मशाली समाजाला संघटित करुन शिक्षणाने दिशा दिली

### प्रा.वीरभद्र बत्तीन यांचे प्रतिपादन; शहरात कै. गुरुवर्य बत्तिन यांची १३७ वी जयंती साजरी


पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. गुरुवर्य बत्तिन यांची १३७ वी जयंती शहराच्या गांधी मैदान येथील प्रा. बत्तिन पोट्यन्ना प्राथमिक विद्यालयात साजरी करण्यात आली.

नगर – कै. गुरुवर्य बत्तिन यांनी शैक्षणिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाने समाजाची प्रगती साधली गेली. पद्मशाली समाजाला संघटित करुन जागृत केले. आजही समाजातील युवक–युवतींना प्रगतीसाठी उच्च शिक्षित होवून पुढे जावे लागणार असल्याचे प्रा.वीरभद्र बत्तीन यांनी सांगितले.

पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. गुरुवर्य बत्तिन यांची १३७ वी जयंती शहराच्या गांधी मैदान येथील प्रा. बत्तिन पोट्यन्ना प्राथमिक विद्यालयात साजरी करण्यात आली. कै. प्रा.बत्तिन यांच्या प्रतिमेचे पूजन करुन त्यांना अभिवादन करण्यात आले.

प्रा. बत्तिन पोट्यन्ना यांचे नातू प्रा.वीरभद्र बत्तीन यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष बाळकृष्ण सिद्दम, शैक्षणिक सामाजिक प्रतिष्ठानचे कार्यवाहक ज्ञानेश्वर मंगलाराम, सचिव प्राध्यापक बाळकृष्ण गोटीपामुल, कुमार आडेप, शंकरराव नक्का, शिवाजीराव संदुपटला, सहसचिव सविताताई कोटा, विश्वस्त व शालेय समिती अध्यक्ष राजेंद्र म्याना, मुख्याध्यापक श्रीनिवास मुत्याल आदींसह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

बाळकृष्ण सिद्दम म्हणाले की, कै. गुरुवर्य बत्तिन यांचे कर्तृत्व व विचार आजही समाजाला दिशादर्शक आहे. कै. गुरुवर्य बत्तिन यांनी समाजसेवचे व्रत घेऊन शिक्षणाने समाजाला प्रकाशवाट दाखवली. त्यांच्या योगदानातून शहरात सक्षमपणे पद्मशाली समाज उभा राहिला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शालेय विद्यार्थी भक्ती साळुंखे, त्रिवेद अमृतवाड, लावण्या पेंटेवार यांनी कै. गुरुवर्य बत्तिन यांच्या जीवनावर भाषणे केली. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शालेय शिक्षक रावसाहेब इंगळे, शोभा बडगु, अनंता गाली, रत्ना रच्चा, पुष्पा म्याकल यांनी परिश्रम घेतले.

# आजचे जीवनसंगीत

या आधुनिक आणि वेगवान युगामध्ये आपल्या वितभर पोटाची खळगी भरण्यासाठी आपल्याला रोज जी धावपळ आणि झोंबा झोंबी करावी लागते, त्या अंदाधुंद दिनक्रमामध्ये या बदलत्या काळानुसार आपण हळूहळू आपल्या आरोग्याविषयी शरीराविषयी अजून ही जागरूक झालेलो नाहीत, हे वारंवार सिद्ध होते आहे. सरासरी वयाचा आलेख जरी वाढला असला तरी निरोगी जीवनाचा आलेख अधोगतीला गेला आहे.

आजची आधुनिक जीवनशैली यामध्ये हा शब्दच सांगून जातो की, चुकीची जीवनशैली! कारण ज्या शरीराच्या आणि मनाच्या सुख समाधानासाठी आपण एवढी दगदग, धावपळ करत असतो, त्याच शरीराकडे आणि मनाच्या आरोग्याकडे आपण साफ दुर्लक्ष करीत असतो.


जागतिक योग दिवस आणि जागतिक संगीत दिवस हे परस्पर पूरक असलेले जीवनाचे दोन आयाम एकाच दिवशी साजरा करणं, हा काही निव्वळ योगायोग नाही, मुळात माणसाचं शरीर हेच निसर्गाने जन्माला घातलेलं एक चालतं बोलतं सुंदर असं संगीत वाद्य आहे. आपण जर थोडा विचार करून पाहिला तर, आपल्या या शरीररुपी वाद्यामध्ये सगळ्या क्रिया कशा तालबद्ध, स्वरबद्ध, लयबद्ध चालतात, याचे खरोखरच आश्चर्य वाटते, परंतु असा स्वतःच्या अंतर्मनात स्वतःच्या शरीरात डोकावून पाहायला आपल्याला वेळ कुठे आहे..

मोबाईल आणि टीव्ही पाहायला आपल्याकडे भरपूर वेळ आहे. आपल्या हृदयातलं आणि मेंदूतलं मेमरी कार्ड आणि सिम कार्ड पूर्णपणे करप्ट होऊन गेलेलं आहे.

त्यामुळे चांगलं काही स्टोअर देखील होत नाही आणि आसपास सदबुद्धीचा टॉवरच नसल्यामुळे माणुसपणाची कशाची रेंज देखील येत नाही. वारंवार टॉप अप करत राहायचं असेल तर योग, प्राणायाम, संगीत या तीन कंपन्यांचाच रिचार्ज आपल्याला जगाच्या संपर्कात ठेवू शकतो. नाहीतर लवकरच आपण फोटोला हार घालून नेटवर्क कव्हरेज एरियाच्या बाहेर निघून जातो.

आपण आपल्या शरीराचा दिवसातून एकदा तरी काही मिनिटे अभ्यास केला पाहिजे.

आपल्या डोळ्याच्या पापण्यासुद्धा साधारणपणे तीन सेकंदाला एकदा यांत्रिकपणे फडकतातच, आपला श्वास एका विशिष्ट लयीत चालतो, आपले हृदय एका विशिष्ट तालात धडकतं. आपल्या शरीरातलं रक्त एका विशिष्ट वेगाने संचार करते, रस्त्याने साधे चालताना सुद्धा आपले पाय आणि हात विशिष्ट रिदम मध्येच मागेपुढे होत असतात, असे हे आपले शरीर निसर्गानेच ट्यूनप करून पाठवलेले सुंदर




वाद्य आहे. जोपर्यंत या वाद्यामधले हे श्वास, ही डोळ्यांची उघडझाप ही हृदयाची धडधड, लयी मध्ये सुरामध्ये, आणि तालामध्ये चाललेली आहे, तोपर्यंत आपण स्वस्थ आणि निरोगी आहोत, परंतु जेव्हा यामध्ये थोडा जरी सूक्ष्म बदल झाला, तरीपण आपल्याला आयसीयू नावाच्या गॅरेजमध्ये दाखल व्हावे लागते.

नाकातोंडामध्ये नळ्या खूपसून घ्याव्या लागतात.. तेव्हा कुठे श्वासाचे महत्व समजतं.. परंतु फक्त ॲडमिट असेपर्यंतच श्वासाचं महत्त्व.. डिस्चार्ज मिळाल्यावर घरी आल्यावर पुन्हा पहिले पाढे ५५ ... म्हणून योगाद्वारे हेच सांगितले जाते की, आपलं अस्तित्व असलेल्या शरीरामधली हृदयाची धडधड, श्वासांची बासरी, आणि हातापायाचे चालबद्ध नृत्य.. हेच खरे जीवन संगीत.. जे आपल्याला लक्षपूर्वक कधीच दुर्दैवाने ऐकावसे वाटत नाही.

आपण अजिबात काळजी घेत नसलेल्या या शरीराच्या सगळ्या इतर भौतिक गरजांसाठी केवळ ज्यामुळे आपण जिवंत आहोत, ज्यामुळे आपली ओळख आहे, ज्यामुळे आपल्याला किंमत आहे, ज्यामुळे आपण जीवनाचा आस्वाद घेऊ शकतो. अशा शरीराकडे आपण इतके दुर्लक्ष कसे काय करू शकतो? याचे आश्चर्य वाटते.. कारण जसे एखादे वाद्य जर मधुर ट्यूनप असेल तरच ते मैफिलीमध्ये टाळ्या घेऊन जातं.. ते थोडं जरी बेसूरं असलं तर टाळ्यांच्याऐवजी त्याला टाळणं सुरू होतं. तसंच आपलं हे शरीर जर आतून पोकळ झालं, निकामी होऊ लागलं, कुरबुरी तक्रारी वाढल्या, तर आपले सगळे सगेसोयरे, नातेगोते, प्रेमाचे लाडके सगळेजण टाळणारच आहेत, पण याचा जेव्हा प्रत्यक्ष साक्षात्कार होतो तेव्हा फार उशीर झालेला असतो.

ज्या श्वासांवर हे शरीररुपी मंदिर उभं आहे. त्या श्वासांवर लक्ष केंद्रित करून स्थिर होणे म्हणजेच योग. अशी योगाची सगळ्यात सोपी परिभाषा आहे आणि आपल्याकडून नेमकं २४ तासांमध्ये २४ मिनिट देखील हेच घडत नाही. ज्या श्वासावर आपण जिवंत आहोत, त्या श्वासाचा आपल्यापाशी काहीच मूल्य नाही.

श्वासोच्छ्वासाला वैद्यकीय भाषेमध्ये पॅरासिंपथेटिक प्रोसेस असे म्हणतात. म्हणजे याचा अर्थ असा की ही श्वास घेण्याची प्रक्रिया शरीराकडून आपोआप होत असते. ती आपल्याला मुद्दाम करावी लागत नाही, त्यासाठी आपण जागे असलो, झोपलेलो असलो, शुद्धीत असलो, बेशुद्ध असलो, इतर कुठल्या कामातही मशगुल असलो, तरी देखील श्वास घेण्याची प्रक्रिया आपसूक लयबद्ध चालू असते. ते एका निरोगी शरीराचे लक्षण आहे, परंतु जेव्हा आपल्याला सगळ्या हालचाली मुद्दाम कराव्या लागतात, त्यावेळी आता आयुष्याचा रिचार्ज संपत आलेला आहे, असं समजायला हरकत नाही, कारण सुदृढ शरीरामध्येच सुदृढ आत्मा रहिवास करतो.

ही तालबद्धता लयबद्धता मनःशांती आणि जीवनाची सुरावट सुमधुर करण्यासाठी योग आणि संगीत याचा सारखा दुसरा साधा सरळ मार्ग नाही..

लता दीदी देखील म्हणायच्या की निसर्गाशी आणि परमेश्वराशी एकरूप होण्यासाठी साधा सोपा शॉर्टकट मार्ग आहे, तो म्हणजे संगीत...

म्हणून या वेळेस जागतिक संगीत दिनानिमित्त जी थिम ठेवलेली आहे त्या थीमचं नाव आहे..

हिल विथ हार्मनी

आजच्या या जागतिक योग आणि संगीत दिवसानिमित्त आपण आपले जीवन संगीत आणि त्या रंगमंचावरचा ऑर्केस्ट्रा आजूबाजूच्या सामाजिक वैचारिक, प्रदूषणांमुळे, तर्ककर्कश्य न करता, रडगाणे न गाता, हे छोटेसे जीवन सुमधुर अशा हृदय स्पर्शी भावगीतामध्ये बदलवू या!

कुणास काय ठाऊके..

**कसे कुठे उद्या असू?**
**निळ्या नभात रेखिली.. नकोस ती भावना तू**
**पुसू.. तुझ्या मनीच राहिले..**
**तुला कळेल गीत हे..**
**असेल मी, नसेल मी,**
**तरी असेल गीत हे..**
**फुला फुलात येथल्या..**
**उद्या हसेल गीत हे..**

**– सुहासभाई मुळे, मो. ९००२६६८५५५**
**संगीत समीक्षक**
**(आकाशवाणी व दूरदर्शन)**

# समाजाच्या मुख्य प्रवाहात तृतीयपंथीयांना आणण्यासाठी सर्व शासकिय अधिकाऱ्यांनी संवेदनशीलपणे काम करावे

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया**



जिल्हाधिकारी कार्यालयात तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

नगर – तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी संवेदनशीलपणे काम करावे. समाजामध्ये त्यांना सन्मानाने जगता यावे, यासाठी शासनाच्या सर्व योजनांचा तृतीयपंथीयांना प्राधान्याने लाभ देऊन देशासह राज्यात जिल्ह्याची वेगळी ओळख निर्माण करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण व कल्याण योजनेंतर्गत सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

कार्यशाळेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महापालिका आयुक्त यशवंत डांगे, लेखिका–कवयित्री दिशा पिंकी शेख, जिल्हास्तरीय समितीच्या सदस्य काजलगुरु नगरवाले, समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार, समाजकल्याण निरीक्षक संगीता चितळे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, समाजामध्ये तृतीयपंथीयांबाबत अनेक गैरसमज आहेत. समाजाचा त्यांच्याविषयीचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे. तृतीयपंथीय शिक्षणापासून वंचित राहिल्यामुळे त्यांना उदरनिर्वाहासाठी भिक्षेवर गुजराण करावी लागते. तृतीयपंथीयांना त्यांच्या पायावर उभे राहून समाजात सन्मानाने जगता यावे, यासाठी कौशल्याधारित प्रशिक्षण देण्यात यावे. उद्योग उभारणीसाठी दायित्व निधीतूनही निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. आजपर्यंत जिल्ह्यात २०० तृतीयपंथीयांची नोंदणी झाली असून, ज्यांची अजूनही नोंदणी झालेली नाही, त्यांची नोंदणी करून घेण्यात येईल. शासकीय कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक तृतीयपंथीयांना सन्मानाची वागणूक देऊन शासनाच्या योजनांचा लाभ देण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी म्हणाले, शासकीय सेवेच्या कालावधीत अशा प्रकारची कार्यशाळा प्रथमच अनुभवतो आहे. तृतीयपंथीय हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक तृतीयपंथीयापर्यंत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाहीही त्यांनी दिली.

जिल्हास्तरीय समितीच्या सदस्य काजलगुरु नगरवाले म्हणाल्या, तृतीयपंथीयांनाही समाजामध्ये सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बहुतांश तृतीयपंथीय निरक्षर असल्याने अनेकवेळा शासकीय योजनांचा लाभ घेताना अडचणी येतात. सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांनी तृतीयपंथीयांप्रती संवेदनशील राहून, शासकीय कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक तृतीयपंथीयांना मदत करावी. त्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांना सन्मानाने जगण्याचा अधिकार द्यावा, असे त्या म्हणाल्या.

दिशा पिंकी शेख म्हणाल्या, तृतीयपंथीय समुदायावर अजूनही अनेक प्रकारची सामाजिक, मानसिक व आर्थिक कुचंबणा होत आहे. त्यांना शिक्षण, रोजगार व आरोग्यसेवेत समान संधी मिळणे आवश्यक आहे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या दृष्टिकोनात बदल घडवणे हीच खरी गरज आहे. लैंगिकता ही व्यक्तीची ओळख असते. ती केवळ स्त्री किंवा पुरुष या परंपरागत चौकटीत मावणारी नसते. समलैंगिक, उभयलिंगी, तृतीयपंथीय व ट्रान्सजेंडर व्यक्तींचा समाजात सकारात्मक स्वीकार व्हावा, यासाठी आपण सर्वांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.

प्रास्ताविकात सहायक आयुक्त प्रवीण कोरगंटीवार म्हणाले, तृतीयपंथीयांना शासन योजनांच्या लाभातून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी ही कार्यशाळा हा राज्यातील पहिलाच प्रयोग आहे. संविधानाने सर्वांना समान संधी व हक्क दिलेले आहेत. परंतु तृतीयपंथीयांना आजही अनेक ठिकाणी उपेक्षा, भेदभाव व असमानतेला सामोरे जावे लागते. तृतीयपंथीयांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रशासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत. तृतीयपंथीयांची ऑनलाईन नोंदणी, संजय गांधी निराधार अनुदान, मतदार ओळखपत्र, शिधापत्रिका यांसारख्या योजनांचा लाभ देण्यात आला आहे. श्रीरामपूर तालुक्यात तृतीयपंथीयांसाठी घरकुल संकुल व स्मशानभूमीसाठी ३ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. तृतीयपंथीयांनी आत्मनिर्भर व्हावे, यासाठी मौजे चितळी येथे शेळीपालन व्यवसायही सुरू करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी दिली.

कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रसन्ना धुमाळ यांनी केले, तर आभारप्रदर्शन समाजकल्याण निरीक्षक संगीता चितळे यांनी केले.

कार्यशाळेला सर्व विभाग प्रमुख तसेच दूरदृष्यप्रणालीद्वारे तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मोटारसायकल भाड्याने देऊ इच्छिणाऱ्यांनी प्रादेशिक परिवहन विभागाशी संपर्क साधावा

नगर – मोटार वाहन अधिनियमानूसार रेंट–ए मोटार सायकल स्कीम १९७७ अंतर्गत मोटार सायकल भाड्याने देण्यासाठी लायसन्स देण्याची तरतूद करण्यात आली होती. परंतू शासनाच्या १२ एप्रिल २०१६ च्या पत्रानूसार मोटार सायकल भाड्याने देण्यासाठीचे लायसन्स देण्यावर निर्बंध घालण्यात आले होते. शासनाने हे निर्बंध २८ एप्रिल २०२५ रोजीच्या पत्रान्वये मागे घेतले असल्याने मोटार सायकल भाड्याने देण्याचा व्यवसाय करु इच्छिणाऱ्यांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे यांनी केले आहे.

# जैन कॉन्फरन्सच्या आत्मध्यान योजना राष्ट्रीय मंत्रीपदी अशोक बलदोटा यांची नियुक्ती



नगर – ऑल इंडिया श्वेतांबर स्थानकवासी जैन कॉन्फरन्स, दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष अतुल जैन आणि आत्मध्यान योजनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शशीभाऊ कर्नावट यांनी आत्मध्यान योजनेच्या राष्ट्रीय मंत्रीपदी अहिल्यानगरमधील अशोक बलदोटा यांची नियुक्ती केली.

अशोक बलदोटा यांची जैन धर्माबद्दल असलेली तळमळ, साधू–संतांची सेवा करताना अग्रेसर रहाण्याचा श्रध्दाभाव, धार्मिक कार्यक्रमातील सहभाग, समाजातील प्रतिष्ठा आणि त्यांचा एकूणच सेवाभाव लक्षात घेऊन ही नियुक्ती करण्यात आली आहे. ते नगरच्या जुना बाजार येथिल संजीवनी मेडिकलचे संचालक असून गेली ४८ वर्षे मेडिकल व्यवसायात कार्यरत आहेत. शहरातील महावीरनगर येथील श्रावक संघाचे महामंत्री म्हणून कार्यभार सांभाळत आहेत. विविध सामाजिक, शैक्षणिक व अध्यात्मिक संस्थांची मानाची पदे त्यांनी भूषविली आहेत.

नियुक्ती झाल्यानंतर बोलताना अशोक बलदोटा म्हणाले जैन कॉन्फरन्स ही समाजातील सर्वोच्च शिखर संस्था आहे. या संस्थेच्या आत्मध्यान योजनेच्या राष्ट्रीय महामंत्रीपदावर नियुक्ती होणे हा मोठा बहुमानच आहे. या पदाच्या माध्यमातून आत्मध्यानाचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच परमात्म्यासोबत तल्लीन होण्याचा आनंद अधिकाधिक समाजबांधवांना मिळवून देण्यास कटिबध्द रहाणार आहे. १३ जुलैला सुरत येथे शपथविधी कार्यक्रम आचार्यश्री डॉक्टर शिवमुनि म.सा.च्याच सानिध्यामध्ये आयोजित केला आहे.



## तेलंगानाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना निमंत्रण

हैदराबाद राजभवनमध्ये तेलंगानाचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांना जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकविणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्यावतीने बी के डॉ. दीपक हरके यांनी भेट घेऊन संस्थेद्वारा जगभरात शिकविल्या जाणाऱ्या राजयोग ध्यान पध्दतीबद्दल माहिती देऊन संस्थेच्या आंतरराष्ट्रीय मुख्यालय माऊंट आबूला भेट देण्याचे निमंत्रण दिले. तसेच त्यांना ओम शांती मीडियाचा अंक भेट दिला. यावेळी लंडन येथील मिसेस ईनिग्मा वर्ल्ड विजेत्या डॉ. परिन सोमाणी उपस्थित होत्या.

# अन्नसुरक्षा जनजागृतीसाठी नगरमध्ये आंतरशालेय नाट्य स्पर्धेचे आयोजन




नगर – हायजीन फर्स्ट व आय लव्ह नगर या संस्थेच्या वतीने अहिल्यानगर शहरात अन्नसुरक्षा जनजागृती आंतरशालेय नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी २१ जून ते १ जुलै या दरम्यान नावनोंदणी करणे आवश्यक असून ही स्पर्धा ९ ते १५ जुलै या दरम्यान अहिल्यानगर मधील विविध शाळांमध्ये होणार आहे. शाळांनी यात सहभगी होऊन विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छ व निर्जंतुक अन्न पदार्थांच्या जनजागृती मोहिमेत सहभागी व्हावे, असे आवाहन सदस्या वैशाली मुनोत यांनी केले.

स्पर्धेत मराठी व इंग्रजी माध्यमाच्या शाळा सहभागी होऊ शकतात. स्पर्धेसाठी गूगल फॉर्म द्वारे नावनोंदणी आवश्यक असून नोंदणी झालेल्या शाळांमध्ये ९ ते १५ जुलै या कालावधीत स्लॉटनुसार विद्यार्थ्यांना शाळांमध्ये नाट्य सादर करता येईल यासाठी परीक्षक शाळांमध्ये जाऊन नाटकाचे व शाळेचे परिक्षण करतील.

या स्पर्धेत कमीतकमी ५ व जास्तीत जास्त १० विद्यार्थ्यांचा संघ नाट्य सादर करू शकतो. सर्वोत्तम सादरीकरण करणाऱ्या संघाला व सर्वात स्वच्छ शाळेला आकर्षक बक्षीस देऊन सन्मानित करण्यात येईल. माहितीसाठी ९४२००२८२१२, ९२८४७९७६१६

# ‘ॲबॅकस व वैदिक गणित वर्गाचे’ २६ जूनपासून नगरमध्ये आयोजन

नगर – ‘अलोहा’ या आंतरराष्ट्रीय संस्थेद्वारे अहिल्यानगर येथे ॲबॅकस व वैदिक गणित प्रशिक्षण वर्गाचे आयोजन २६ जून पासून करण्यात आले आहे. गेल्या १९ वर्षापासून ‘आनंद ॲकॅडमी’ येथे हे प्रशिक्षण दिले जाते. ॲबॅकस ही गणिताची मलेशियन पद्धत असून यामुळे विद्यार्थ्यांच्या मेंदू व बुद्धीचा पूर्ण क्षमतेने विकास होतो. तसेच एकाग्रता आत्मविश्वास, स्मरणशक्ती, सतर्कता, आकलनशक्ती, सूक्ष्मनिरीक्षण, कार्यक्षमता, तत्परता या गुणांचा विकास होतो.

‘आनंद ॲकॅडमी’ मध्ये ॲबॅकसचे ज्युनियर आणि सिनीयर असे दोन वर्ग चालवले जातात. ॲबॅकस ज्युनियर हे इयत्ता १ ली व २ रीच्या विद्यार्थ्यांसाठी आणि ॲबॅकस सिनीयर हे इयत्ता ४ थी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी आहे. वैदिक गणित ही पद्धत आपल्या प्राचीन वेदातील गणिताची पद्धत असून हे वर्ग इयत्ता ५ वी पासुनच्या विद्यार्थ्यांसाठी घेतले जातात. ‘अलोहा’ या संस्थेद्वारे १८ देशात ५००० केंद्राद्वारे ५० लाखापेक्षा जास्त विद्यार्थ्यांना ॲबॅकस प्रशिक्षण दिले गेले आहे. ‘आनंद ॲकॅडमी’ या अहिल्यानगर मधील केंद्रात १९ वर्षांपासून हे वर्ग सुरू आहेत.

मार्केटयार्ड परिसरात याचे वर्ग २६ जूनपासून सुरू होत आहेत. याचा जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन संस्थेच्या संचालिका व उत्कृष्ट शिक्षिका राष्ट्रीय पारितोषिक प्राप्त सौ. सुरेखा जयदीप लोढा यांनी केले आहे.माहितीसाठी ९४२०६४३८१९ या क्रमांकावर संपर्क साधावा.



स्नेहबंध फौंडेशनतर्फे सहा.पोलीस निरीक्षक प्रल्हाद गीते यांचा सन्मान करताना डॉ. उद्धव शिंदे, राहुल द्वारके, मोहिनी कर्डक, गायत्री धनवडे.

# अनिवार्य ऐवजी सर्वसाधारण असे शब्द बदल करून हिंदी भाषा लादण्याचा निर्णय रद्द करावा

**सक्ती मागे न घेतल्यास या विरोधात राज्यव्यापी तीव्र आंदोलन करणार; मराठीच्या खुनाचा प्रयत्न सुरु भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा आरोप**

नगर – अनिवार्य ऐवजी सर्वसाधारण असा शब्द बदल करून महाराष्ट्रात हिंदी भाषेची सक्ती करण्याचाच प्रयत्न केला जात आहे. अनिवार्यच्या ऐवजी सर्वसाधारण असा शब्द बदल म्हणजे, फडणवीस सरकारने मराठी भाषेच्या खूनाचा प्रयत्न सुरू केला आहे. अशा परखड शब्दात समाचार घेत भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र राज्य कौन्सिलने हिंदी भाषा लादण्याचा निर्णय रद्द करण्याची मागणी केली असल्याची माहिती भाकपचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी दिली.

मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता असून संस्कृतीचा भाग आहे. महाराष्ट्राच्या धमन्यांमध्ये मायबोली मराठीचा बाणा आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे ढोंग करायचे आणि पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहु, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात हिन्दी सक्तीची करायची या दुटप्पी निर्णयातून भाजपा–राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे महाराष्ट्रद्रोही असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्रात पहिलीपासून पाचवीपर्यंत मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये हिंदी सक्तीची करण्याचा फडणवीस सरकारचा निर्णय मराठी भाषा, महाराष्ट्राची अस्मिता व मराठी संस्कृतीवर हल्ला आहे. संयुक्त महाराष्ट्र आणि भाषावार प्रांतरचनेसाठी लढलेला भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मराठी माणूस हे कदापि सहन करणार नाही. रा.स्व. संघाचे जोशी यांचे मुंबईत मराठीत बोलण्याची गरज नाही हे विधान आणि हिंदी पहिली ते पाचवी सक्तीची हा फडणवीसांचा निर्णय हा मराठी विरोध! या एकाच दिशेने जात आहे. भाजपाला समर्थन देणाऱ्या मराठी माणसाला या निर्णयाने धक्का बसल्या शिवाय राहणार नाही. भाजपा ही बहुजन हिंदूंची व मराठी माणसाची कधीही होऊ शकत नाही. महागाई, बेरोजगारीने होरपळणाऱ्या हिंदूंची काळजी भाजपाला नाही. हे देखील सर्वांच्या लक्षात येत असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

हिंदीसह सर्व भाषांबद्दल भारतीय कम्युनिस्ट पक्षाला आदर आहे. मराठीसह इतर अनेक भाषेत संवादाचा आम्ही आदर करतो. मात्र महाराष्ट्रामध्ये मराठी शिवाय इतर कोणत्याही भाषेची सक्ती करणे अयोग्य असून, हिंदी बाबत अनिवार्यच्या ऐवजी सर्वसाधारण असे शब्दप्रयोग करून महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल करुन हिंदी भाषा लादण्याचा प्रयत्न करु नये, असे म्हंटले आहे.

भाजप हा द्वेष पसरवणारा पक्ष आहे, मुंबई महापालिका निवडणुकीच्या तोंडावर मराठी विरूद्ध हिंदी वाद निर्माण करून मते मिळवण्यासाठी तुम्ही कितीही मराठीवर हल्ला केला तरी भाकपा मराठी भाषा आणि मराठी माणसाच्या बाजूने ठामपणे उभी आहे. मराठी बद्दलचे बेगडी व बनावट प्रेम असणारे व त्यांच्या वर्चस्वाखाली राहणारे नकली, उथळ नेतृत्व या निमित्ताने उभे करून गोदी मिडियाद्वारे त्याला मोठे करण्याचेही फडणवीसांचे षडयंत्र असू शकते. यापासूनही जनतेने सावध रहावे. हिंदी भाषेबद्दल द्वेष निर्माण करून अराजकता पसरवण्याचा देखील हा डाव आहे. विविध भाषा, संस्कृती, विविध खानपाण, विविध पेहराव, विविध सणवार राष्ट्रीय एकात्मतेने नटलेल्या भारत देशाचे तुकडे करण्याचा हा भाजपाचा डाव आहे! पहिली ते पाचवीच्या कोवळ्या मुलांवर राजकीय कुउद्देशाने प्रेरीत अशा प्रकारची सक्ती अवैज्ञानिक व बाल माणसशास्त्राच्या विरोधात असल्याचे भाकपच्या वतीने भूमिका मांडण्यात आली आहे.

राज्य सरकारने पहिलीपासून हिंदी भाषा लादण्याचा आपला निर्णय या पार्श्वभूमीवर तातडीने मागे घ्यावा अशी मागणी भारतीय कम्युनिस्ट पक्ष महाराष्ट्र राज्य कौन्सिल करत आहे. सरकारने महाराष्ट्रातील जनतेची भावना लक्षात घेऊन सक्ती मागे न घेतल्यास या विरोधात राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

# आरोही संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची उज्वल परंपरा कायम

नगर – अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबईच्यावतीने एप्रिल २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या संगीत परीक्षेत आरोही संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यशाची उज्वल परंपरा कायम राखली आहे. अहमदनगर (९९) या केंद्रात स्वरा नन्नवरे, आदित्य साळवे, जयराम नवले हे विद्यार्थी तबला वादन परीक्षांमध्ये केंद्रात प्रथम आले आहेत. संस्कार बापू जाधव या विद्यार्थ्याने उपांत्य विशारद ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. परीक्षा निहाय निकाल पुढील प्रमाणे प्रारंभिक सार्थक कोंबडे, राजनंदिनी क्षीरसागर, स्वरा नन्नवरे, वैष्णवी वारे, आशिष मिरपगार, ओंकार सायकर, प्रवेशिका प्रथम रुद्राक्ष कामठे, वैभव बागडे, कृष्णा कापरे, दुर्गा इंगोले, सार्थक उंडे, विराट खोडदे, ॲड. किरण जाधव प्रवेशिका पूर्ण ज्ञानेश्वरी मांढरे, आदित्य साळवे. माध्यमा प्रथम जयराम नवले, समृद्धी शेळके मध्यमा पूर्ण प्रदीप मांढरे, संदीप मांढरे, तुषार कोऱ्हाळे, मोहित होन, प्रेरणा गुडगळ, विनोद चौधरी. विशारद प्रथम संस्कार जाधव.


संस्थापक अध्यक्ष स्वप्निल खराडे (तबला विशारद), संचालिका सौ. शितल खराडे (बी ए संगीत), संगीत शिक्षक आदेश चव्हाण (एमए संगीत) यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

## जागेवर निवड संधी उपक्रमात २८ उमेदवारांची निवड

नगर – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योकता मागदर्शन केंद्र, अहिल्यानगर यांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या जागेवर निवड संधी उपक्रमामध्ये सन फार्मासिटीकल इंडस्ट्रीज प्रा. लि. व महालक्ष्मी टोमोबाईल प्रा. लि. या दोन कंपन्यांनी ८६ रिक्त पदे अधिसूचित केली होती. नोकरी इच्छुक ७७ उमेदवारांपैकी २८ उमेदवारांची प्राथमिक तर २३ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली असल्याची माहिती कौशल्य विकास विभागाचे प्र. सहायक आयुक्त रविकुमार पंत यांनी दिली आहे. या उपक्रमामध्ये प्र. सहायक आयुक्त रविकुमार पंत, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन अधिकारी शुभदा पाठक यांनी उपस्थित उमेदवारांना मार्गदर्शन करत युवकांनी रोजगार स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वत:च्या जीवनाला योग्य दिशा देण्याचे आवाहनही यावेळी केले.

# निरामय

## काय असते मुव्हमेंट डिसऑर्डर?



हालचालींशी संबंधित विकार (मूव्हमेंट डिसऑर्डर) ही सामान्य समस्या आहे, मात्र न्यूनगंडामुळे त्याकडे फारसे लक्ष दिले जात नाही. शिवाय हा विकार जीवघेणा नसल्याने अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जाते. त्याचे प्रमाण वयोगटानुसार बदलते. विशिष्ट हालचाल विकारांचे प्रमाण वयाबरोबर वाढते. काही वेळा अनुवांशिकतेमुळे किंवा मेंदूला दुखापत झाल्याने हा विकार जडू शकतो.

नवे काही

**डॉ. संपत केदारे**

**वयोगटानुसार प्रमाण**

'नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसीन' मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालानुसार २०१२ ते २०१८ या कालावधीत देशातील प्रमुख शहरांमध्ये १४ हजार ५६१ नव्या रुग्णांवर 'मूव्हमेंट डिसऑर्डर क्लिनिक'मध्ये उपचार झाले. यात ९ हजार ५७८ पुरुष आणि ४ हजार ९८३ महिलांचा समावेश होता. सामान्यतः ५० ते ५९ वयोगटातील लोकांमध्ये या आजाराचे प्रमाण १८.५५ टक्के तर ८० ते ८९ वयोगटातील लोकांमध्ये ५१.३ टक्क्यापर्यंत प्रमाण आढळते. पुरुषांमध्ये आणि स्त्रियांमध्ये हालचाल विकारांचे प्रमाण समान असते.

'मूव्हमेंट डिसऑर्डर'मुळे शरीरावरील नियंत्रण सुटते. हात पाय थरथरू शकतात आणि बोलण्यात अडचण येऊ शकते. इच्छेनुसार काम करता येत नाही. प्रत्येक प्रकारच्या हालचालींवर याचा परिणाम होऊ शकतो. अनेक कारणांमुळे मूव्हमेंट डिसऑर्डर होऊ शकतो.

## नियंत्रण फॅटी लिव्हरचं



सध्याचं जीवन खूपच धकाधकीचं, धावपळीचं झालं आहे. आहाराच्या पद्धती बदलत चालल्या आहेत. जंक फूड, बाहेरचे तेलकट पदार्थ खाल्ल्याचे परिणाम शरीरावर दिसू लागले आहेत. जीवनशैलीशी संबंधित अनेक विकार डोकं वर काढू लागले आहेत. मधुमेह, उच्च रक्तदाब, उच्च कोलेस्टरॉल, स्थूलपणा हे एकेकाळी पन्नाशीनंतर जडणारे विकार आता तिशीतच जडू लागले आहेत. या विकारांसोबतच 'नॉन अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसिज' (एनएएफएलडी)चं प्रमाण वाढत चाललं आहे.

एनएएफएलडी हा यकृताचा आजार आहे. नावावरून हा खूप दुर्धर आजार वाटत असला तरी प्रत्यक्षात जीवनशैलीत थोडेफार बदल करून या विकारावर नियंत्रण ठेवता येतं. इतकंच नाही तर हा विकार बराही होतो. या व्याधीचं निदान झाल्यानंतर रुग्णाने पोषक आहार घेणं गरजेचं असतं. आहारातल्या पोषक घटकांचा दर्जा वाढवणं, संतुलित आहार घेणं, वजन आणि दैनंदिन हालचालींनुसार आहाराचं प्रमाण ठरवणं या बाबींकडे लक्ष दिल्यास हा विकार नियंत्रणात राहू शकतो. कर्बोदक, प्रथिनं आणि फॅट्स यांचं आहारातलं गुणोत्तर ५:२:१ इतकं असणं गरजेचं असतं. एनएएफएलडीच्या नियंत्रणात आहाराची खूप मोठी भूमिका असते.

दृष्टीक्षेप

**कोणते बदल करावेत?**

गुंतागुंतीच्या कर्बोदकांचं प्रमाण वाढवायला हवं. धान्यं, भाज्या तसंच बीन्समध्ये गुंतागुंतीची कर्बोदकं असतात. तसंच ग्लायसेमिक इंडेक्स कमी असणाऱ्या पदार्थांचं सेवन करावं. तसंच दूध, साखरेसारख्या पदार्थांच्या सेवनावर मर्यादा आणायला हवी. या पदार्थांमध्ये साधारण कर्बोदकं असतात. आहारातल्या तेल आणि तुपाच्या प्रमाणाकडे विशेष लक्ष द्यायला हवं. तसंच संपृप्त चरबीयुक्त बटर, मायोनिज असे पदार्थ टाळायला हवेत. डाळी, लो फॅट दुग्धजन्य पदार्थ, अंड्याचा पांढरा भाग तसंच ओमेगा ३ युक्त मासे यांचा समावेश आहारात करायला हवा. आहारातल्या मिठाच्या प्रमाणावरही नियंत्रण ठेवायला हवं. गडद हिरव्या, लाल, नारिंगी आणि पिवळ्या रंगाच्या फळांचा तसंच भाज्यांचा समावेश करणंही गरजेचं आहे. यासोबतच आवळा, हळद, ॲव्हॉकॅडो, जवस, सूर्यफुलाच्या बिया आणि आक्रोड या घटकांचं प्रमाण वाढवता येईल. प्री आणि प्रो बायोटिक पदार्थांचं सेवन वाढवायला हवं. फॅटी लिव्हरमुळे हृदयाशी संबंधित आजार जडू शकतात. त्यामुळे एअरोबिक्स तसंच इतर प्रकारचे व्यायाम करून स्वत:ला तंदुरुस्त ठेवता येईल. किमान ३० मिनिटांचा सौम्य ते तीव्र स्वरुपाचा व्यायाम उपयोगी पडू शकतो. जलद चालणं, पोहणं, सायकल चालवणं हे व्यायाम या रुग्णांना खूप लाभदायी ठरू शकतात.

या पद्धतीने जीवनशैलीतल्या थोड्याफार बदलांमुळे तुम्ही फॅटी लिव्हरमुक्त आयुष्य जगू शकता.

## बाळासाठी तरी धूम्रपान टाळा

हल्ली प्रजननक्षम वयाच्या महिलांमध्ये धूम्रपानाचे प्रमाण वाढत चालले आहे. विशेषतः २५ ते ३५ या वयोगटातील महिलामध्ये ही समस्या आढळते. धूम्रपान प्रजनन क्षमतेवर परिणाम करते, गर्भधारणेच्या गुंतागुंतीची शक्यता वाढवते आणि गर्भाशयात तसेच जन्मानंतर बाळाच्या विकासातदेखील अडचणी निर्माण करते.

**निकोटीन आईच्या दुधात**

गरोदरपणात धूम्रपान केल्याने आई आणि बाळाचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. सिगारेटमध्ये असलेली निकोटीन, कार्बन मोनोक्साइड आणि टारसारखी विषारी रसायने गर्भाला होणारा ऑक्सिजनचा पुरवठा कमी करतात. यामुळे गर्भाच्या वाढीत अडथळे येऊ शकतात, गर्भपात होऊ शकतो, अकाली जन्म होऊ शकतो किंवा मृत बाळ जन्माला येऊ शकते. यामुळे आईला गर्भनाळेसंबंधी समस्या (जिथे प्लेसेंटा खूप लवकर गर्भाशयातून वेगळे होते) होण्याचा धोकादेखील वाढतो. शिवाय निकोटीन गर्भाशयातील रक्तप्रवाहावरदेखील परिणाम करते. त्यामुळे गर्भाचा विकास मर्यादित होतो. निकोटीन आईच्या दुधात जाऊ शकते. त्यामुळे बाळाची झोप, आहारातील पोषकता आणि दीर्घकालीन न्यूरोडेव्हलपमेंटमध्येही व्यत्यय येऊ शकतो. इतकेच नव्हे तर धूम्रपान करणाऱ्यांना एक्टोपिक गर्भधारणा होण्याची आणि प्रसूती आणि प्रसूतीदरम्यान समस्या येण्याची शक्यता अधिक असते. 'इन व्हिट्रो फर्टिलायझेशन' (आयव्हीएफ) सारख्या प्रजनन उपचार घेणाऱ्या महिलांनी धूम्रपान केल्यास त्यांच्या यशाचे प्रमाण कमी होते.

जाणून घ्या

**डॉ. मेघा दळे**



**धूम्रपानाचा बाळावर कसा परिणाम होतो?**

धूम्रपान करणाऱ्या मातांच्या पोटी जन्मलेल्या बाळांचे वजन कमी असण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे भविष्यात त्या बाळाला आरोग्याच्या विविध समस्या उद्भवू शकतात. अशा बाळाला 'सडन इन्फंट डेथ सिंड्रोम' (एसआयडीएस), श्वसनमार्गातील संसर्ग, दमा आणि वर्तणुकीशी संबंधित समस्यांचा धोकादेखील जास्त असतो. गर्भधारणेदरम्यान धूम्रपान केल्याने बाळाच्या मेंदूच्या विकासावरही परिणाम होऊ शकतो आणि विकासात्मक अडचणींचा धोका वाढतो. गर्भधारणेदरम्यान धूम्रपान केल्याने एपिजेनेटिक बदलांद्वारे बाळाच्या डीएनएमध्येदेखील बदल होतो. त्यामुळे लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी समस्या यांसारख्या विकारांचा धोका वाढतो.

**बाळाच्या मेंदूच्या विकासावर परिणाम**

गर्भधारणेदरम्यान धूम्रपान केल्यास बाळाला पहिला श्वास घेण्यापूर्वीच हानिकारक विषारी पदार्थांचा सामना करावा लागतो. धूम्रपान बाळाच्या मेंदूच्या विकासावर, फुफ्फुसांच्या कार्यावर आणि दीर्घकालीन आरोग्यावरही परिणाम करू शकते. धूम्रपान सोडणे हे आई आणि बाळ अशा दोघांचेही जीवन सुरक्षित ठेवते. महिलांनी गर्भधारणेदरम्यान निरोगी राहण्याची सवय केली पाहिजे. गर्भवती महिलांनी यशस्वी गर्भधारणा आणि प्रसूतीसाठी डॉक्टरांनी दिलेल्या सल्ल्याचे पालन केले पाहिजे.

## संधीवाताने वात आणलाय?

संधीवात म्हणजे एका किंवा अनेक सांध्यांमध्ये होणाऱ्या वेदना. ही एक चिवट व्याधी असून रुग्णाला मोठ्या कालावधीसाठी तिचा सामना करावा लागतो. अस्वस्थता, सांध्यांचा कडकपणा आणि मर्यादित हालचाली ही या व्याधीची वैशिष्ट्ये आहेत. संधीवात एखाद्याच्या हालचालींवर आणि जीवनाच्या गुणवत्तेवर परिणाम करतो. संधीवाताचे विविध प्रकार आहेत. ऑस्टियोआर्थायटिस हा प्रकार सांध्यांची झीज झाल्यामुळे होतो.

**संधीवात हा एक 'ऑटोइम्युन'** प्रकारातला विकार आहे. हवामानातील बदलांमुळे संधीवाताच्या रुग्णांची लक्षणे वाढतात. अनेकांना उबदार, कोरड्या हवामानापेक्षा थंडीत तसेच पावसाळ्यात जास्त वेदना जाणवू शकतात.



**इकडे लक्ष द्या**

नियमित शारीरिक हालचाली केल्याने लवचिकता वाढते. स्नायू बळकट होतात आणि संधीवाताचा त्रास कमी होऊ शकतो. पोहणे किंवा सायकलिंगसारखे हलके व्यायाम करा आणि व्यायाम करण्यापूर्वी पुरेसे 'वॉर्म अप' करत आहात याची खात्री करा. सांध्यांवर दाब येईल अशा क्रिया करणे टाळा. दररोज स्ट्रेचिंग करायला विसरू नका. कोणतीही फिटनेस दिनचर्या सुरू करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे. बाहेरचे हवामान थंड असताना शक्यतो बाहेर फिरणे टाळा. गुडघ्यांमध्ये संधीवात असल्यास खाली बसणे, मांडी घालून बसणे किंवा पायऱ्या चढणे टाळा.

व्याधीविकार

**डॉ. अंजिक्य बोऱ्हाडे**

**हे सोपे उपाय**

स्नायूंमध्ये उबदारपणा राखण्यासाठी आणि स्नायूंमधील कडकपणा टाळण्यासाठी संपूर्ण शरीर झाकले जाईल असे कपडे घाला. खूप थंड वातावरण असल्यास थर्मल कपड्यांचा वापर करा. थंडीच्या दिवसात थंडीपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी हातमोजे, कान झाकण्यासाठी टोपी आणि पायात मोजे घाला. वेदना कमी करण्यासाठी आणि स्नायूंचा कडकपणा कमी करण्यासाठी शरीर उबदार राखणारे पर्याय निवडा. स्नायूंमधील रक्त प्रवाह सुधारण्यासाठी हीटिंग पॅड, टॉवेल थेरेपी वापरणे किंवा गरम पाण्याने आंघोळ करणे योग्य राहील.

वजनावर नियंत्रण आणि भरपूर पाणी

जास्त वजन सांध्यांवर अतिरिक्त दबाव टाकते. त्यामुळे संधीवाताची लक्षणे वाढण्याची शक्यता असते. वजन नियंत्रित राखल्यास ताणातून काही प्रमाणात आराम मिळतो. अस्वस्थता कमी होते. निरोगी तसेच आनंदी राहू शकता. पुरेसे पाणी प्यायल्याने सांध्यांना पुरेसे वंगण मिळेल आणि सांध्यातील सूज कमी होऊ शकते. सांध्याचे आरोग्य चांगले राखण्यासाठी दररोज किमान १२-१५ ग्लास पाणी प्यावे.

आहाराकडे लक्ष द्या


संधीवात असलेल्यांनी साखर, रिफाइंड आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन टाळावे. मासे, जवस, अक्रोड, बेरी आणि ॲंटिऑक्सिडंट्सयुक्त पालेभाज्या यासारखे ओमेगा-३ फॅटी ॲसिडयुक्त पदार्थ खावेत. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार व्हिटॅमिन डी सप्लिमेंट्स घ्यावेत.

## कोणतं पेय ठरतं योग्य?

आयुर्वेदाने वात, पित्त आणि कफ असे त्रिदोष सांगितले आहेत. निरोगी रहाण्यासाठी या तीन दोषांचं संतुलन राखणं गरजेचं असतं. आयुर्वेदिक उपचारांमध्ये तज्ज्ञमंडळी तुमचा दोष ओळखून त्यानुसार उपायोजना करतात. दोषानुसार आहार, व्यायाम सुचवले जातात. आपल्या आहाराचा आणि या दोषांचा जवळचा संबंध आहे. आपण विविध प्रकारची पेयं पितो. आयुर्वेदानुसार शरीरातले दोष आणि पेयं यांचा खूप जवळचा संबंध आहे. म्हणूनच कोणती पेयं प्यायला हवीत याबाबतचं हे मार्गदर्शन...

✽ वात दोषामुळे शरीर कोरडं पडत असल्यामुळे हा दोष असणाऱ्यांनी जास्तीत जास्त द्रव पदार्थांचं सेवन करायला हवं. फळं, भाज्या तसंच इतर द्रवपदार्थांचं सेवन करून तुम्ही पाण्याची गरज भागवू शकता. वात दोष असणारे लोक बारीक असतात. हे लोक उत्साही आणि कल्पकही असतात. त्यांना आरोग्य राखण्यासाठी हर्बल चहा, दूध, फळं आणि भाज्यांचे रस यांचं सेवन करता येईल. ब्लॅक टी, ग्रीन टी, कॉफी, कॅफेनयुक्त पेयं, फसफसणारी पेयं यांचं सेवन मात्र टाळावं.

✽ पित्त दोषामध्ये मध्यम प्रमाणात पाणी प्यावं लागतं. पित्त दोष असणाऱ्यांना खूप थंडी वाजते. हे लोक मध्यम बांध्याचे असतात. त्यांच्या चेहऱ्यावर मुरुमांचं प्रमाणही अधिक असतं. या लोकांनी नारळाचं पाणी, हिरव्या भाज्यांचे रस, गोड फळांचे रस तसंच जास्वंद, लवेंडर, गुलाब तसंच जास्मिन फ्लेवरचे हर्बल टीही पिता येईल. बीयर, वाईन तसंच आंबट फळांचे सर मात्र टाळावेत.



आयुर्वेद आणि विकार

✽ कफ दोष असणाऱ्यांना पाणी कमी प्रमाणात प्यायलं तरी चांगतं.

## मलेरियाचा हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवरही परिणाम

मलेरिया केवळ ताप येणारा आजार नसून तो हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवरही परिणाम करू शकतो. मलेरिया हा एक गंभीर आजार आहे. तो प्रामुख्याने प्लाझमोडियम परजीवींमुळे होतो. तो अनेकदा संक्रमित ॲनोफिलीस डास चावल्यामुळे पसरतो. उष्णकटिबंधीय प्रदेशात मलेरिया मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता असते. मलेरिया असलेल्यांना तीव्र ताप, घाम येणे, थंडी वाजणे, डोकेदुखी, मळमळ आणि पुरेशी विश्रांती घेतल्यानंतरही खूप थकवा जाणवणे अशी **लक्षणे दिसून येतात.**



आराग्यचर्चा

**डॉ. कुंदन गायकवाड**

**मलेरियाची लक्षणे**

मलेरियामुळे गंभीर गुंतागुंत होऊ शकते. उपचार न केल्यास ते घातक ठरू शकते. गंभीर प्रकरणांमध्ये हा संसर्ग शरीरात वेगाने पसरतो आणि यकृत, मेंदू आणि मूत्रपिंडांसारख्या महत्त्वाच्या अवयवांना नुकसान पोहोचवू शकतो. या विशिष्ट संसर्गामुळे जळजळ होऊ शकते. सामान्य रक्ताभिसरणात व्यत्यय येऊ शकतो आणि हृदय आणि रक्तवाहिन्यांवर ताण येऊ शकतो. हृदयरोग, उच्च रक्तदाब किंवा अशक्तपणा असलेल्या व्यक्तींना याबाबत विशेष सावधगिरी बाळगली पाहिजे कारण त्यांना मलेरियामुळे हृदयाशी संबंधित गुंतागुंत होण्याचा धोका अधिक असतो.

**कसा होतो परिणाम?**

हृदयावर आणि रक्तवाहिन्यांवर मलेरियासारख्या आजाराने गंभीर परिणाम होऊ शकतो. यामुळे गंभीर गुंतागुंतदेखील निर्माण होऊ शकते आणि ती रुग्ण बरे झाल्यानंतरही काही काळ टिकून राहू शकते. यामुळे रक्ताच्या गुठळ्या तयार होण्याचा धोका वाढू शकतो.

## कारणं स्नायूदुखीची

अतिताण हे स्नायूंमधल्या वेदनांचं कारण असू शकतं यावर कदाचित आपला विश्वास बसणार नाही. ताणतणावाचा संबंध मानसिक आरोग्याशी जोडला जातो. पण याच ताणामुळे स्नायूंचं दुखणं उद्भवू शकतं. स्ट्रेस हार्मोन्समुळे शरीर व्याधींचा मुकाबला करू शकत नाही. तणावाखाली असणाऱ्या माणसांची दमछाक होते. तसंच दाहामुळे त्यांच्या स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात. त्यामुळे खूप ताण आल्यावर अंग दुखू लागतं. पाण्याची कमतरता हे सुद्धा स्नायूंच्या दुखण्याचं महत्त्वाचं कारण म्हणता येईल. पाणी हा शरीराला अत्यंत आवश्यक असणारा घटक आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता तुमचं आरोग्य बिघडवू शकते. पाण्याच्या कमतरतेमुळे डोकेदुखी, थकवा तसंच इतर समस्या जाणवू शकतात. शरीराला आपलं कार्य सुरू ठेवण्यासाठी विविध पोषक घटकांची आवश्यकता असते. या पोषक घटकांमुळे आपला मेंदू तल्लख होतो. हाडं बळकट होतात आणि शरीर निरोगी रहातं. एखाद्या पोषक घटकाच्या कमतरतेमुळे स्नायूंमध्ये वेदना जाणवू शकतात.




आरोग्यवेध

---

नवसंशोधन

### अतिझोप ठरते घातक!


पुरेशी झोप घेणं किती गरजेचं आहे हे आपण जाणतो. पण जास्तीची झोपही घातक ठरू शकते. नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेतल्यास पक्षाघाताचा धोका जवळपास २३ टक्क्यांनी वाढत असल्याचं एका संशोधनातून समोर आलं आहे. सात तास किंवा आठ तासांपेक्षा कमी झोप घेणाऱ्यांच्या तुलनेत नऊ तासांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांना पक्षाघात होण्याची शक्यता अधिक असल्याचं शास्त्रज्ञांचं म्हणणं आहे. इतकंच नाही तर दुपारच्या वेळी अधिक झोप घेतल्यानेही त्रास होऊ शकतो. दुपारच्या वेळी ९० मिनिटांपेक्षा अधिक झोप घेणाऱ्यांनाही पक्षाघात होण्याची शक्यता २५ टक्क्यांनी वाढत असल्याचं हे संशोधन सांगतं. 'न्यूरोलॉजी' या जर्नलमध्ये हे संशोधन प्रसिद्ध झालं आहे. त्यामुळे झोप प्रमाणातच घेणं योग्य ठरतं.



काळजी डोळ्यांची

### का सुजतात डोळे?

पुरेशी झोप घेतल्यानंतरही अनेकदा आपले डोळे सुजल्यासारखे, थकल्यासारखे दिसतात. यामागे बरीच कारणं असतात. ॲलर्जी किंवा जंतूसंसर्गामुळे डोळे सुजल्यासारखे दिसू शकतात. प्रदूषित कण किंवा कुत्रा-मांजरासारख्या पाळीव प्राण्यांचे केस डोळ्यात गेल्यामुळे ॲलर्जी होऊ शकते आणि यामुळे शांत झोप घेतल्यानंतरही डोळे सुजल्यासारखे दिसतात. पाण्याच्या कमरतेमुळेही डोळे सुजल्यासारखे वाटतात. आपल्या डोळ्यांलगतची त्वचा खूप नाजूक असते आणि पाण्याच्या कमतरतेमुळे ती कोरडी पडून सुजल्यासारखी वाटते.



जपणूक त्वचेची




### 'बायोटिन'च्या सेवनाने...

त्वचेचं आरोग्य जपण्यासाठी विविध पोषक घटकांची गरज असते. या पोषक घटकांमुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होऊ शकतात. 'बायोटिन' नामक जीवनसत्त्व त्वचेसाठी खूप लाभादायी ठरतं. बायोटिन हा ब जीवनसत्त्व गटातला घटक आहे. बायोटिनला 'ब ७' असंही म्हटलं जातं. पालक, अंडी, मशरूम, बदाम, फ्लॉवर, चीझ, रताळं, शेंगदाणे, आक्रोड आणि दुग्धजन्य पदार्थांमध्ये ब ७ हे जीवनसत्त्व असतं. त्यामुळे यांचा समावेश आहारात करायला हवा.

आजीबाईचा बटवा

### आरोग्यदायी जर्दाळू

जर्दाळू अत्यंत पौष्टिक आहे. हिवाळ्यात जर्दाळूचं सेवन करायला हवं. यात तंतूमय पदार्थांचं प्रमाण बरंच जास्त असतं. त्यामुळे वजन कमी करण्यासाठी जर्दाळूचं सेवन करता येईल. यातल्या फायबरमुळे पोट बराच काळपर्यंत भरलेलं रहातं. पण जर्दाळूचं सेवन प्रमाणातच करायला हवं. जर्दाळूमध्ये लोहही भरपूर प्रमाणात असतं. यामुळे शरीरातली लोहाची कमतरता यामुळे भरून निघते. जर्दाळूतले पोषक घटक त्वचेसाठीही लाभदायी ठरतात. यातल्या 'क' आणि 'ई' या जीवनसत्त्वांमुळे त्वचेला आवश्यक पोषण मिळतं. जर्दाळू डोळ्यांसाठीही लाभदायी आहे. तसंच यामुळे पचनसंस्थेचं कार्यही सुधारतं. तर अशा या जर्दाळूचा समावेश आहारात करायलाच हवा.





जिल्हा आयुष रुग्णालयात आंतरराष्ट्रीय योगदिन साजरा करण्यात आला.

# जिल्हा आयुष रुग्णालयात योगदिन साजरा

नगर – जिल्हा रुग्णालय व जिल्हा आयुष रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा आयुष रुग्णालयात ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. साहेबराव डावरे, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. दर्शना धोंडे–बारवकर, जिल्हा आयुष रुग्णालयाच्या प्रभारी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सोनाली बांगर, डॉ. मनोज घुगे, परिचारिका महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती वैशाली कोरडे, योगविद्याधामचे कार्यकारी अध्यक्ष सुभाष पांढरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या योगवर्गात आयुष मंत्रालय भारत सरकारच्या निर्देशाप्रमाणे योगासने, प्राणायाम, ध्यान करण्यात आले. योग वर्गाचे संचालन योगविद्याधाम संस्थेच्या योग प्रशिक्षक श्रीमती दीपमाला लांडे आणि श्रीमती कविता साखरे यांनी केले.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी योग शास्त्राचा रोगोपचार आणि स्वास्थ रक्षणासाठीबाबतचे महत्व विषद केले. २३ ते २७ जुन दरम्यान जिल्हा आयुष रुग्णालयात योग प्रशिक्षण वर्ग आयोजित केलेला आहे. दुपारी ४ ते ५ दरम्यान योग सत्र होणार आहेत. नागरिकांनी या वर्गाचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. कीर्ती शेळके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयुष वैद्यकीय अधिकारी डॉ.शौनक मिरीकर, डॉ. जयश्री मस्के, डॉ. इर्शाद मोमीन, डॉ.नाजिया शेख, डॉ. शोभा धुमाळ, डॉ.अर्चना लांडे, असिस्टंट मेट्रन अजिंक्य पवार व सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# प्रत्येक भारतीयाने निरोगी आरोग्यासाठी योगचा स्वीकार करावा : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

**आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा; जिल्हा क्रीडा संकुल झाले योगमय; जिल्हाधिकारी, सीईओ, मनपा आयुक्त व शिक्षणाधिकारी यांचा सहभाग**




शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

नगर – शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, जिल्हा प्रशासन, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अकरावा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. २१ जून रोजी सकाळी वाडिया पार्क जिल्हा क्रीडा संकुलमधील बॅडमिंटन हॉल योगमय झाला होता.

प्रारंभी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने आंतरराष्ट्रीय योग दिवस कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते, माध्यमिक शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे आदींसह जिल्ह्यातील शासकीय कार्यालयातील विभाग प्रमुख व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले की, संपूर्ण जगात आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा होत आहे. प्रत्येक भारतीयाने निरोगी व सुदृढ आरोग्यासाठी योगचा स्वीकार करण्याची गरज आहे. योगाने समाज निरोगी होणार होवून सक्षम व सशक्त भारताचे स्वप्न साकारले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या योग दिनाच्या कार्यक्रमासाठी शहरातील विविध क्रीडा संघटना, पोलीस अॅकॅडमीतील प्रशिक्षणार्थी, योग साधक व खेळाडू तसेच नागरिक सहभागी झाले होते. यावेळी योग, प्राणायाम, ध्यानधारणाचे धडे प्रात्यक्षिकासह देण्यात आले. उपस्थित सर्व शासकीय अधिकारी यांनी देखील योग कार्यक्रमात सहभाग नोंदवून विविध आसने केली.

योगमय वातावरणात डॉ. अमोल बागुल यांनी सुमधुर बासरी वादन केले. आर्ट ऑफ लिव्हिंग, पतंजली योग संस्था, योग विद्या धाम, एमएमवायटीसी व योग संघटना यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला.

पाहुण्यांचे स्वागत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून रोपे देऊन करण्यात आले. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी उपस्थितांना निरोगी आरोग्यासाठी योग संकल्पाची शपथ दिली. योग दिनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित खेळाडू नागरिक मान्यवरांना अल्पोपहार व पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. ज्ञानेश्वर खुरंगे यांनी आभार मानले.

# शहरातील दिंडी मार्गावर मनपातर्फे पिण्याचे पाण्याची व्यवस्था; साफसफाई, वारकऱ्यांच्या सुविधेसाठी मोबाईल टॉयलेट उपलब्ध





नगर – येत्या दोन दिवसात अहिल्यानगर शहरातून दिंड्या मार्गस्थ होणार आहेत. त्यांच्या मुक्कामाच्या ठिकाणी व दिंडी मार्गावर महानगरपालिकेकडून पिण्याचे पाणी व शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मार्केटयार्ड परिसरात दिंडी मुक्कामी राहणार असल्याने या ठिकाणी महानगरपालिकेने संपूर्ण साफसफाई केली असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातून जाणाऱ्या काही पालख्या अहिल्यानगर शहरात मुक्कामाला असतात. शहरातून जाणाऱ्या दिंडी मार्गावर वारकऱ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेने नियोजन केले आहे. शहरातील दिंडी मार्गावर पिण्याचे पाणी, पेट्रोल पंपाच्या ठिकाणी पंप चालकांशी संपर्क साधून स्वच्छता गृहाची व्यवस्था करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मार्केटयार्ड परिसरात दिंडी मुक्कामी असल्याने या ठिकाणी संपूर्ण स्वच्छता करण्यात आली आहे. त्यासाठी काही कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच १०० मोबाईल टॉयलेट उपलब्ध करून देण्यात आले आहेत. दिंडी मार्गावर व मुक्कामाच्या ठिकाणी प्लॅस्टिक अथवा थर्माकोलचा वापर होणार नाही, या दृष्टीने नियोजनाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच दिंडी मार्गावर कचरा संकलनासाठी कर्मचारी व घंटागाडी उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचेही यशवंत डांगे यांनी सांगितले.

# मनपातील अपहाराच्या चौकशीसाठी राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानकडून तीन अधिकाऱ्यांची समिती नियुक्त

नगर – महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील १६.५० लाखांच्या अपहार प्रकरणी महापालिका स्तरावर व आरोग्य विभागाच्या नाशिक उपसंचालक कार्यालयाकडून नियुक्त केलेल्या समितीच्या चौकशीनंतर आता राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान कार्यालयाकडूनही या प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्यासाठी तीन अधिकाऱ्यांची समिती नियुक्त करण्यात आली आहे.

राज्य कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे येथील राज्य वित्तीय सल्लागार गौरव जोशी, राष्ट्रीय आरोग्य अभियान या लेखा विभागाचे बजेट अॅण्ड फायनान्स अधिकारी दिनेश शिंदे, अहिल्यानगर जिल्हा परिषदचे जिल्हा लेखा व्यवस्थापक उदय देशपांडे यांच्या नियुक्तीचे आदेश अभियानाच्या सहाय्यक संचालक डॉ. दिप्ती देशमुख यांनी काढले आहेत. अपहार प्रकरणाची महापालिका स्तरावरुन, तसेच उपसंचालक स्तरावरुन प्राथमिक चौकशी करण्यात आलेली आहे.

या दोन्ही चौकशीमध्ये आर्थिक अनियमतता व वसूलपात्र रकमेबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आलेली नाही. विभागस्तरावरुन करण्यात आलेल्या चौकशीमध्ये या प्रकरणाची सखोल चौकशी व लेखापरिक्षण राज्यस्तरावरुन करण्याची विनंती चौकशी समितीने केली होती. त्यानुसार ही चौकशी करण्यात येणार आहे. सखोल चौकशी करुन स्वयंस्पष्ट अहवाल दस्ताऐवजासह १५ दिवसांच्या आत सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# १० हजार रुपयांची लाच घेताना गटविकास अधिकाऱ्याला पकडले

**नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची श्रीराम चौक येथे कारवाई**

नगर – सेवानिवृत्त होण्यापूर्वी निलंबित झालेल्या ग्रामसेवकाचा दोषारोप पत्राचा अहवाल त्यांच्या बाजूने देण्यासाठी १० हजारांची लाच घेणाऱ्या राहुरी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. सुधाकर श्रीरंग मुंडे (वय ५७, रा. केशव कुंज रोड, श्रीराम चौक, ऐश्वर्या नगरी, अहिल्यानगर) असे या अधिकाऱ्याचे नाव आहे. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेत आयोजित केलेल्या बैठकीसाठी ते शहरात आले होते. श्रीराम चौक येथे त्यांना लाच घेताना पकडण्यात आले.

सेवानिवृत्त ग्रामसेवकावर गटविकास अधिकाऱ्यांच्या अहवालावरून जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी निलंबनाची कारवाई केली होती. त्यानंतर ते सेवानिवृत्त झाले होते. निलंबन प्रकरणी सुरू असलेल्या चौकशी प्रकरणी दोषारोप पत्राचा अहवाल गट विकास अधिकारी पाठवणार होते. हा अहवाल ग्रामसेवकाच्या बाजूने पाठविण्यासाठी मुंडे यांनी दहा हजारांची लाच मागितली. निवृत्त ग्रामसेवकाने याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुसार श्रीराम चौक परिसरात सापळा रचून मुंडे याला लाच घेताना रंगेहाथ पकडण्यात आले. सदरची कारवाई नगरच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक छाया देवरे, पोलिस नाईक चंद्रकांत काळे, सचिन सुद्रुक, हरुण शेख यांच्या पथकाने केली. लाचखोर गटविकास अधिकारी मुंडे याच्या विरोधात तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# झेंडीगेट परिसरात महानगरपालिकेची अतिक्रमणांवर कारवाई; ओपन स्पेसमधील टपऱ्या, पत्र्याचे शेड कारवाई करून हटवले

**नागरिकांनी स्वतःहून अतिक्रमणे काढावीत अन्यथा जेसीबीच्या सहाय्याने जमीनदोस्त करणार : आयुक्त**





नगर – झेंडीगेट परिसरात असलेल्या दक्षिणमुखी हनुमान मंदिर समोरील, तसेच गैबी पीर ओपन स्पेसमध्ये असलेल्या अतिक्रमणांवर मनपाकडून कारवाई करण्यात आली. अनधिकृत पत्रा शेड, तसेच १० ते ११ टपऱ्या व भंगारचे पत्रा शेड महानगरपालिकेने कारवाई करून हटवले. गेल्या काही महिन्यांपासून शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरू आहे. यात आता महानगरपालिकेच्या ओपन स्पेसवरील अतिक्रमणांवर कारवाई सुरू करण्यात आल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली.

महानगरपालिकेच्या झेंडीगेट प्रभाग समिती कार्यालयाच्या क्षेत्रात ही कारवाई सुरू करण्यात आली. अतिक्रमण निर्मूलन विभागाचे उपअभियंता सुरेश इथापे, प्रभाग अधिकारी, क्षेत्रीय अधिकारी रिजवान शेख, अर्जुन जाधव यांच्या पथकाने कोतवाली पोलिसांच्या बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने अतिक्रमणांवर कारवाई केली. हनुमान मंदिरा–समोर व गैबी पीर ओपन स्पेसवर पत्र्याचे शेड व टपऱ्या टाकून अतिक्रमणे करण्यात आली होती. महानगरपालिकेने ही अतिक्रमणे जमीनदोस्त केली.

शहरात अतिक्रमण हटाव मोहीम सुरूच राहणार आहे. रस्त्यावरील अतिक्रमणांसह आता महानगरपालिकेच्या जागा व ओपन स्पेसवर असणाऱ्या अतिक्रमणांवरही कारवाई करण्यात येणार आहे. ज्या नागरिकांनी रस्त्यावर किंवा महानगरपालिकेच्या जागेत अतिक्रमणे केली असतील, ती तत्काळ स्वतःहून काढून घ्यावीत, अन्यथा महानगरपालिका कारवाई करून अतिक्रमणे जमीनदोस्त करेल. कारवाईत संबंधित अतिक्रमण धारकाचे नुकसान झाल्यास त्याला महानगरपालिका जबाबदार असणार नाही, असेही यशवंत डांगे यांनी म्हटले आहे.

# फसवून नेलेली महिलेची मोपेड पोलिसांनी परत मिळवून दिली



फसवून नेलेली मोपेड पोलिसांनी परत मिळवून दिल्यानंतर त्या समवेत मीरा जगताप.

नगर – महिलेची एकाने फसवून चोरुन नेलेली मोपेड गाडी कोतवाली पोलिसांनी तात्काळ शोधून त्या महिलेस परत मिळवून दिली आहे. ही कामगिरी २० जून रोजी दुपारी केली.

या बाबतची माहिती अशी की मिरा भरत जगताप (रा. माळीवाडा, अ.नगर) याची सुझुकी एक्सेस मोपेड (क्र.एम एच १६ डी एल ५०६०) ही संकेत रविंद्र लांडगे (रा. हिंगणगाव, ता.नगर) याने फसवून चोरुन नेली होती. बाबतची मीरा जगताप यांनी त्यास गाडी बाबत विचारणा केली असता लांडगे याने त्यांच्याशी संपर्क करण्याचे टाळले. तसेच त्यांनी गाडीवर रेडीयमने लिहिलेले जय शंकर असे स्टिकर काढून गाडीची ओळख मिटवण्याचा प्रयत्न केला. याबाबत जगताप या तक्रार देण्याकरीता कोतवाली पोलीस ठाण्यात आल्या असता ठाणे अंमलदार पो. ना. अनिता तारडे यांनी त्यांचे म्हणणे ऐकून घेऊन पोलीस उप निरीक्षक प्रवीण पाटील यांना सांगितले.

त्यावर पोलीस अंमलदार राजेंद्र केकाण यांनी तात्काळ लांडगे यास संपर्क करुन पोलीस ठाण्यात बोलावून विचारपूस करुन, तसेच घटनेचे गांभीर्य कडक व काही सौम्य शब्दात समजावून सांगितल्याने लांडगे याने मोपेड परत आणून जगताप यांना सुपूर्त केली. गाडी परत मिळाल्याने त्यांचे समाधान झाले. ही कारवाई पोलीस उप निरीक्षक प्रविण पाटील यांचे मार्गदर्शनाखाली पो. ना. अनिता तारडे व पो. कॉ. राजेंद्र केकाण यानी केली आहे.

# जमिनीकडे जाणारा रस्ता खुला करण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर 'आमरण उपोषण' सुरू



जमीनीकडे जाणारा रस्ता खुला करण्याच्या मागणीसाठी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत.

नगर – भाळवणी ते ढवळपुरी रस्त्यालगत असलेल्या मागासवर्गीय कुटुंबीयांची शेत जमीनीकडे जाणारा शेत पाणंद रस्ता खुला करुन देण्याची मागणी सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आली आहे. सदर मागणीचे निवेदन प्रभारी निवासी जिल्हाधिकारी यांना देण्यात आले होते. शेत जमीन बळजबरीने विकत घेण्याच्या उद्देशाने मागासवर्गीय कुटुंबीयांना त्रास दिला जात असल्याने त्रास देणाऱ्या व्यक्तींवर अॅट्रॉसिटी अॅक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करून रस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करताना सत्यशोधक अण्णाभाऊ साठे स्मारक प्रतिष्ठानचे अध्यक्ष नामदेवराव चांदणे, रामदास साळवे, संतोष शेलार, राजेंद्र आल्हाट, सूर्यभान वैराळ, बापू साळवे, संपत गायकवाड, अजित चौधरी, रमेश वैराळ, आकाश वैराळ, चंदा साळवे, किशोर भालेराव, राजेंद्र चौधरी, ताराबाई वैराळ, बाबा वैराळ, कौशल्य वैराळ, सचिन वैराळ, राजू आल्हाट, राजू वैराळ, सुनील सकट, एकनाथ सकट, तुषार सकट आदी उपस्थित होते.

पुढे निवेदनात म्हटले आहे की, भाळवणी येथे मागासवर्गीय वैराळ कुटूंबीय शेती व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करत आहे. मात्र ढवळपूरी येथील काही धनदांडगे व्यक्ती त्यांना शेतजमीन विकत देत नसल्याने वैराळ यांना विविध कारणांनी त्रास देत आहे. कोणत्याही कारणाने भांडण करणे, जीवे मारण्याची धमकी देण्याचे प्रकार करत आहे. नुकतेच वैराळ यांच्या शेतीचा रस्ता त्यांनी दगड व काटे टाकून अडविला आहे. भाळवणी ते ढवळपुरी जाणारा रस्ता वैराळ वस्ती जवळ बंद करण्यात आला असून, वैराळ कुटुंबीयांच्या वस्तीवर कोणतेही वाहन येऊ शकत नाही. भाळवणी ग्रामपंचायतीने दलित विकास निधीतून वैराळ वस्तीसाठी ५ लाख रुपये मंजूर करून रस्त्याचे काम सुरू केले आहे. परंतु सदरील धनदांडग्या कुटुंबीयांनी रस्त्याचे काम बंद पाडून रस्ता अडविला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यासंदर्भात पारनेर तहसीलदार यांच्याकडे दाद मागून देखील त्याला कोणत्याही प्रकारे दखल घेण्यात आलेली नाही. सदरचा रस्ता अडविणाऱ्यांवर अॅट्रॉसिटी अॅक्टप्रमाणे गुन्हा दाखल करावा, तात्काळ अडविलेला रस्ता खुला करण्याची मागणी करण्यात आली आहे.

# बोल्हेगाव परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण; गुन्हा दाखल

नगर – घरासमोर भांडी घासत असलेली १६ वर्षीय अल्पवयीन मुलीला अज्ञात व्यक्तीने कशाचे तरी आमिष दाखवत फूस लावून पळवून नेल्याची घटना २० जून रोजी दुपारी बोल्हेगाव गांधीनगर परिसरात घडली. ती बराच वेळ झाला तरी घरात न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा शोध घेतला असता ती परिसरात, नातेवाइकांकडे व मैत्रिणीकडेही कोठेही मिळून आली नाही. त्यामुळे कोणीतरी अज्ञात व्यक्तीने तिला फूस लावून कशाचेतरी आमिष दाखवून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करत तिच्या कुटुंबीयांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

# रात्रीच्यावेळी संशयितरित्या आणखी चौघांना पकडले

नगर – रात्रीच्या वेळी अंधाराचा गैरफायदा घेऊन काहीतरी गैरकृत्य करण्याच्या उद्देशाने स्वतःचे अस्तित्व लपवून संशयितरित्या वावरणाऱ्या आणखी ४ संशयितांच्या पोलिसांनी मुसक्या आवळल्या आहेत. एमआयडीसी पोलिसांनी नागपूर हद्दीत दोघांना पकडले. तर नगर तालुका पोलिसांनी चास गावात एकास व शिराढोण गावात एकास असे दोघांना पकडले आहे.

याबाबतची माहिती अशी की एमआयडीसी पोलीस रात्री पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना नागापूर येथील राहुल वाईन्सच्या शेजारी टपरीच्या आडोशाला अंधारात दबा धरून बसलेल्या अर्जुन खंडू पाचारणे (वय ३०, रा. आदर्शनगर, नागापूर) यास पकडले. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. पोलिसांनी त्यास ताब्यात घेतले. दुसऱ्या कारवाई नागापूर येथील एल अँड टी कॉलनी येथे अंधारात दबा धरुन संशयितरित्या वावरणाऱ्या दिनेश ज्ञानेश्वर मिसाळ (वय २८, रा. रेणुकानगर, बोल्हेगाव) यास ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली नाहीत. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात पोलीस हवालदार राजू सुद्रिक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १२२प्रमाणे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

नगर तालुका पोलिसांनी चास येथे २० जूनला पहाटे एक वाजण्याच्या सुमारास कैलास श्रावण शिंदे (वय २१, रा.मुरमा, ता. धनसांगवी, जि. जालना) यास पकडले. त्याला इतक्या रात्री कोठे फिरतोस इकडे काय करतो असे विचारले असता त्याने समाधानकारक उत्तरे दिली त्यास पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात आणले.

दुसऱ्या कारवाईत शिराढोण गावात संशयितरित्या फिरणाऱ्या लड्या भगवंता भोसले (वय २१ रा. तोंडोली, तालुका पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) यास पकडले. पोलिसांनी त्याच्याकडे रात्री फिरण्याबाबत चौकशी केली असता त्याने उडवाउडवीचे उत्तरे दिली आणि समाधानकारक उत्तरे दिली नाही. यावरून पोलिसांनी लड्या भोसले यास ताब्यात घेतले. याप्रकरणी दोघांच्या विरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

